**सुविचार**
सरलता के बिना कोई भी व्यक्ति अन्य आत्माओं का सच्चा स्नेह नहीं पा सकता ।

(ब्रह्मकुमारीज)


विश्वसनीय बातम्यांचे एकमेश वृत्तपत्र

दैनिक

# यशवंत

✦लातूर/धाराशीव/बीड/नांदेड ✦/शुक्रवार दि. १५ मार्च २०२४✦वर्ष ५२ वे✦अंक-१२२ ✦पृष्ठे८✦किंमत १रुपया ✦RNINO.39924/83 ✦OMD-426/2020-22✦





दैनिक
# यशवंत अहमदपूर/चाकूर परिसर
शुक्रवार दि.१५ मार्च २०२४
E-mail :- yashahmedpur@gmail.com संपर्क मो.९८५०२७३०४७, ९८२३११२९०७


## डॉ.जमील फतरु आतार यांच्या मातोश्री हिदायतबी आतार यांचे दुखद निधन

अहमदपूर दि.१४(कारामुंगीकर) डॉ.जमील फतरु आतार यांच्या मातोश्री हिदायतबी आतार यांचे दुखद निधन झाले आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, मूळचे पानगाव येथील रहिवासी डॉ. जमील आतार यांच्या आई काही दिवसापासून आजारी होत्या त्यांचे उपचार चालू होते. उपचारादरम्यान दवाखान्यातच त्यांचे मृत्यू झाले. त्यांचा अंत्यविधी पानगाव येथील कब्रस्तान मध्ये ता. रेना-पुर जिल्हा लातूर या ठिकाणी अंत्यविधी



करण्यात आला. त्यांच्या अंत्यविधीस दर्शनासाठी महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र प्रदेश येथून मोठ्या संख्येने लोकांनी उपस्थिती लावली होती. त्यांच्या दुःखात सहभागी म्हणून गावातील सर्वच्या सर्व दुकाने व मार्केट संपूर्ण दिवसभरासाठी बंद ठेवण्यात आले होते. विशेष म्हणजे सर्व जाती-धर्मांच्या लोकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली होती. त्यांच्या पश्चात त्यांचे पती फतरु कासिम साब आतार व सहा मुले व एक मुलगी आहेत.

## राष्ट्रसंत डॉ.शिवलींग शिवाचार्य महाराज भक्ती स्थळास खा. सुधाकरराव श्रृगारे यांच्या वतीने एक कोटी पंचेचाळीस लक्ष रु.विकास निधी मंजुर

अहमदपूर दि.१४(कारामुंगीकर) राष्ट्रसंत डॉ.शिवलींग शिवाचार्य महाराज भक्ती स्थळास खा. सुधाकरराव श्रृगारे यांच्या वतीने एक कोटी पंचेचाळीस लक्ष रु.विकास निधी मंजुर केला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, अहमदपूर शहरा-लगत असलेल्या राष्ट्रसंत डॉ. शिवलिंग शिवाचार्य महाराज भक्तीस्थळासाठी विविध विकास कामासाठी लातूर लोकसभा मतदारसंघाचे लोकप्रिय खासदार सुधाकरराव श्रृगारे यांनी एक कोटी पंचेचाळीस लक्ष रु. चा निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल भक्तीस्थळाचे प्रमुख आचार्य गुरूराज स्वामी यांनी खासदार सुधाकरराव श्रृगारे आभार व्यक्त केले आहेत.

अहमदपूर शहरालगत असलेल्या लातूर ते नांदेड राष्ट्रीय महामार्गावरील राष्ट्रसंत डॉ.शिवलिंग शिवाचार्य महाराजांच्या भक्तीस्थळासाठी खासदार सुधाकरराव श्रृगारे यांनी प्रादेशिक पर्यटन विभागाकडून एक कोटी रु. नुकतेच मंजूर केले असून गेल्या फेब्रुवारी महिन्यात तिर्थक्षेत्र विकास जिल्हा वार्षिक नियोजन मधून पंचेचाळीस लक्ष रु. निधी मंजूर करण्यात आले होते त्या पंचेचाळीस लक्ष च्या विकास काम चालूही झाले असल्याने राष्ट्रसंत डॉ शिवलिंग शिवाचार्य महाराज यांच्या भक्तगणामध्ये आनंद उत्सव साजरा केला जात आहे.

खासदार सुधाकरराव श्रृगारे हे राष्ट्रसंत डॉ शिवलिंग शिवाचार्य महाराज यांचे भक्त असल्याचे विकास निधी देऊन खासदार श्रृगारे यांनी सिद्ध करून दाखवले आहे.

महाराष्ट्र, कर्नाटक, आध्रंप्रदेश, तेलंगणा अशा अनेक राज्यामध्ये राष्ट्रसंत डॉ शिवलिंग शिवाचार्य महाराजांचे लाखो भक्त असल्याने विरशैव शिवा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्रा मनोहर धोंडे हे भक्तीस्थळाच्या सर्वांगीण विकासासाठी सतत धडपडत असतात.

खासदार सुधाकरराव श्रृगारे यांच्या मार्फत भक्तीस्थळाच्या विकासासाठी निधी उपलब्ध व्हावा यासाठी खासदार सुधाकरराव श्रृगारे यांच्या कडे पाठपुरावा केला होता. आज अखेर खासद-ार सुधाकरराव श्रृगारे यांनी निधीसाठी दिलेल्या शब्द-ापेक्षा कितीतरी जास्तीचा निधी उपलब्ध करून दिल्याने भक्तीस्थळाचे प्रमुख आचार्य गुरूराज स्वामी, भक्तीस्थळाचे विश्वस्त, राष्ट्रसंत डॉ शिवलिंग शिवाचार्य महाराज यांच्या सह लाखो भक्ताकडून खासदार सुधाकरराव श्रृगारे यांचे कौतुक केले जात आहे.

प्रादेशिक पर्यटन विभागाकडून पायाभूत सुविधा पुरवण्यासाठी शासन निर्णय क्रमांक टीडीएस २०२४/०३/प्र.क्र .७२/ पर्यटन-१ नुसार लोकप्रिय खासदार सुधाकरराव श्रृगारे यांनी भक्तीस्थळासाच्या विकास कामासाठी मंजुरी आणल्याची माहिती भारतीय जनता पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष गोविंद गिरी यांनी दिली आहे.

## अहमदपूर भाजपा च्या वतीने राज्य सरकारच्या अभिनंदनाचा ठराव

अहमदपूर दि.१४(कारामुंगीकर) अहमदपूर भाजपा च्या वतीने राज्य सरकारच्या अभिनंदनाचा ठराव घेण्यात आला आहे.



याबाबत अधिक माहिती अशी की, महाराष्ट्र शास-नाने नूकतेच अहमदनगर शहराचे नामांतर करून अहिल्यानगर असे नामकरण करून माता अहिल्यादेवी होळकर यांचा सन्मान केला आहे.त्या बद्दल भाजपा अहमदपूर विधानसभा मतदार संघाच्या वतीने राज्याचे मुख्यमंत्री मा.ना.एकनाथ शिंदे साहेब,उपमुख्यमंत्री मा.ना. देवेंद्रजी फडणवीस साहेब आणी उपमुख्यमंत्री मा.ना.अजितदादा पवार साहेब तसेच संपूर्ण महाराष्ट्र शासनाचा अभिनंदनाचा ठराव प्रदेश प्रवक्ते गणे-शदादा हाक्के पाटील यांच्या अध्यक्षतेखाली एका बैठकीत करून भाजपा कार्यकर्ते तसेच धनगर समाजाच्या वतीने भंडारा उधळून जल्लोष करण्यात आला.

या प्रसंगी बोलताना गणेशदादा हाक्के पाटील म्हणा-ले की, अहमदनगर जिल्ह्याला अहिल्यादेवी होळकरांचे नांव द्यावे ही समाजाची खूप दिवसा पासूनची मागणी होती. आज राज्य सरकारने ही मागणी पूर्ण केली असल्याने समाजाच्या वतीने शासनाचे अभिनंदन करण्याचा ठराव मांडला त्यास समाजातील सर्व प्रतिनिधींनी उपस्थित राहून अभिनंदनाच्या ठरावास पाठींबा दिला.

येथील शासकीय विश्रामगृह येथे समाजबांधव तसेच भाजपा पदाधिकारी यांची तातडीची बैठक प्रदेश प्रवक्ते गणेशदादा हाक्के पाटील यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली.या प्रसंगी माजी सभापती शिवाजीराव खांडेकर,शहराध्यक्ष सूशांत गूणाले, राजकुमार मजगे, ओमभाऊ पुणे, गोविंद-राव गिरी,माणिकराव नरवटे, ज्ञानोबा बडगिरे, रामानंद मुंडे,डॉ सिध्दार्थकुमार सूर्यवंशी, हनमंत देवकते, लखन घोडके, बाल-ासाहेब होळकर, आनंद दवकते, संग्राम नरवटे, शामपाटील देवकते,गंगाराम पोले, कुलदीप हाके, राजकुमार नरवटे, परस-ुराम सुरनर, बळीराम पोले, ज्ञानेश्वर कोळगिर, पांडुरंग पोले, पांडुरंग नरवटे, बालाजी हेमनर, मोतीराम वाडकर, गणेश नरवटे, अरुणभाऊ वाघंबर, बाल-ाजी देवकते, गणेश नरवटे,नाना नरवटे, अरविंद देवकते, राहुल केंद्रे, डॉ गोपाळ माने, व्यंकटराव सुरनर, प्रशांत मुळे, काशीनाथ स्वामी आदींची उपस्थिती होती.

## कै.अशोकराव हाके पाटील यांच्या स्मृतिदिनानिमित्त विविध कार्यक्रम




अहमदपूर दि.१४(कारामुंगीकर) कै.अशोकराव हाके पाटील यांच्या स्मृतिदिनानिमित्त विविध कार्यक्रम*

अहमदपूर- येथील संत ज्ञानेश्वर विद्यालयात कै.अशोकराव हाके पाटील यांचा सतरावा स्मृतिदिन विविध कार्यक्रमाने साजरा करण्यात आला. सकाळी शासकीय रुग्णालयातील रुग्णांना फळ वाटप, विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले.

प्रारंभी विद्यालयात श्री गणेश शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक सचिव कै.अशोकराव हाके पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन करून दोन मिनिटाचे मौन पाळून अभिवादन करण्यात आले. यावेळी संस्थासचिव रे-खाताई अशोकराव हाके पाटील, मुख्याध्यापक आशा रोडगे, मीना तोवर, संजीवनी गुरमे,शबाना शेख ,त्रिगुणा मोरगे ,अश्विनी घोगरे ,शारदा तिरुके, सविता पाटील,अयोध्या जाधव,नंदकुमार मद्देवाड ,सतीश साबणे, बब्रुवान कलाले,उमेश फुलारी, पद्माकर नळगिरे सह शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## तालुकास्तरिय शिक्षक क्षमता वृद्धी प्रशिक्षण तीन टप्प्यांमध्ये गटशिक्षणाधिकारी बबनराव ढोकाडे व राज्य सुलभक कामाक्षी पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पुर्ण

अहमदपूर दि.१४(कारामुंगीकर) क्षिक तालुकास्तरिय शिक्षक क्षमता वृद्धी प्रशिक्षण गटशिक्षणाधिकारी बबनराव ढोकाडे व राज्य सुलभक कामाक्षी पवार यांच्या मार्गदर्शनाखाली तीन टप्प्यांमध्ये पुर्ण झाले.



याबाबत अधिक माहिती अशी की, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे , जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था मुरुड आणि गटसाधन केंद्र अहमदपूर यांच्यावतीने माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षक वृद्धी प्रशिक्षण शहरातील डॉ एस एस एम प्रतिष्ठान येथे आयोजित करण्यात आले होते ते दिनांक २६,२७ व २८ फेब्रुवारी पहिला टप्पा, दिनांक ४,५ व ६ मार्च दुसरा टप्पा व ११,१२ आणि १३ मार्च तिसरा अशा तीन टप्प्यांमध्ये हे प्रशिक्षण पूर्ण करण्यात आले. या प्रशिक्षणात राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० यातील या धोरणाची वैशिष्ट्य ध्येयधोरणे, राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा, अंतर समवाय क्षेत्र,नाविन्यपूर्ण अध्यापन शास्त्र, २१ व्या शतकातील कौशल्य व भविष्यवेधी शिक्षण, व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशन, कुमार अवस्थेतील मुले समजून घेताना ,शाळा आधारित व क्षमता आधारित मूल्यांकन, राष्ट्रीय संपादनूक सर्वेक्षण, राज्य शैक्षणिक संपादक सर्वेक्षण, कार्यक्षमता प्रतवारी दर्शके, कार्यपद्धती व विश्लेषण, कृती संशोधन कार्यपद्धती व कृती संशोधन व उपक्रम माहिती तंत्रज्ञानाचा शिक्षणातील उपयोग , प्रभावी शैक्षणिक नेतृत्व आदी घटका विषयी सविस्तर मांडणी करण्यात आली.या प्रशिक्षणाच्या उद्घाटनापासुन तिसऱ्या टप्प्याच्या समारोपा पर्यंत अहमदपूर पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी बबनराव ढोकाडे , प्रशिक्षण समन्वयक श्रीमती कामाक्षी पवार, श्रीमती मनीषा गुणाले, श्रीमती मंडलवार, श्री सोमनाथ केंद्रे व राम चामे आदींनी परिश्रम घेतले. या प्रशिक्षणा दरम्यान जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था मुरुड च्या प्राचार्या डॉ भागिरथी गिरी व त्यांच्या सहकाऱ्यांनी वेळोवेळी प्रशिक्षणाला भेटी दिल्या. हे सर्व टप्पे पंचायत समिती अहमदपूर चे गटशिक्षणाधिकारी बबनराव ढोकाडे यांच्या मार्गदर्शनाखाली राज्य सुलभक तथा प्रशिक्षण समन्वयक कामाक्षी पवार यांनी प्रशिक्षणाचे नियोजन केले होते. तालुक्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशिक्षणार्थ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी सुलभक म्हणून प्रा. डॉ बाल-ाजी कारामुंगीकर, बाबासाहेब वाघमारे, भिमराव कदम, टेकाळे आर.एस, शिवानंद उंदीरकले , जगताप वाय.एस, पांचाळ एस बी, सोमवंशी एस के , केंद्रे एस. व्ही, जयप्रकाश तपघाले, घाटचेरले, पी.व्ही, गुंडरे एस. पी, एन. टी. गडवे, जी.डी.गिरी, एस. आर. बुरगे, खुडे सर, जवळे सर आदिंचा समावेश होता.

या प्रशिक्षणाच्या तिन्ही टप्प्यात जवळपास ५५० माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकांना प्रशिक्षण देण्यात आले.

## मोटिवेशन च्या अभावी ?

अभाव ही स्थिती कधीही वाईटच! पैशाचा अभाव विद्वत्तेचा अभाव विकासाच्या दृष्टीचा अभाव कधीही त्याज्यच. वैचारिकतेचा अभाव तर सदैव धिक्कारार्हच.

मोटिवेट मी का करीन? ही वृत्ती आपली व कोणाचीच असता कामा नये. पल भर के लिए कोई हमें मोटिवेट कर ले झूठा ही सही याप्रमाणे आपला मोटिवेशनवर विश्वास असो किंवा नसो क्षणभरासाठी गरजवंतास एखाद्यास मोटिवेट करून पहा! आश्चर्यकारक रिझल्ट्स आल्याशिवाय राहणार नाहीत. इमारतीचा पाया पक्का नसेल तर इमारत कोसळते. मोटिवेशन हाच कोणत्याही प्रशासकीय इमारतीचा पाया आहे. प्रशासक प्रशासक कमी आणि मोटिवेटर अधिक असतो! हे विधान सर्व स्तरावरच्या प्रशासकांना लागू होते. आणि म्हणूनच प्रशासकांना प्रशासक कमी मोटिवेटर जास्त मानले जाते. प्रत्येकाच्या गळ्यात जणू एक पाटी डकवलेली असते अदृश्य स्वरूपाची; होय मी मोटिवेटर. या शीर्षकाची. या पाटीला चकाकी आणायची की गंज चढू द्यायचा सर्वस्वी आपल्यावर अवलंबून आहे.

मोटिवेशन या इंग्लिश शब्द-ाचा मराठीत अर्थ अभिप्रेरणा असा आहे. अभिप्रेरणा म्हणजे इतरांना चांगलं कार्य करण्यासाठी प्रेरित करणे. व्यक्तीत त्या क्षमता कौशल्यं दडलेली असतात मात्र तो कळत नकळत त्या विसरून गे-लेला असतो मात्र त्यास ते जाणीव करून देण्याची आवश्यकता असते की तू हे करू शकतोस. विविध क्रीडा सामन्यांच्या प्रसंगी आपण पाहतो की प्रेक्षक वर्ग आपल्या स्पर्धकास सतत मोटिवेट करत असतो. हिप हिप हुर्रे हुर्रे च्या माध्यमातून. बंदुकीत जशी दारू ठासून भरलेली असते तसा प्रशासकामध्ये इतरांना मोटिवेट करण्याचा गुणधर्म ठासून भरलेला हवा! मोटिवेशन हा परवलीचा शब्द झालाय सध्या सैद्धांतिकदृष्ट्या. प्रत्यक्षात मात्र मोटिवेशन ची सध्या अतिशय वाईट स्थिती आहे. ही स्थिती अशीच चालू राहिली तर मोटिवेशन हा शब्द केवळ शब्दकोशात पाहायला मिळेल हो! वर्तमान काळात सामान्य माणूस सध्या जसा चोहोबाजुंनी पिचला जातोय तशी मोटिवेशन संकल्पनेचीही स्थिती झाली आहे.


क्या आज आपने किसीको मोटिवेट किया?
नहीं किया तो क्या किया?
आप किसी को भी मोटिवेट नहीं करते हो तो क्या करते हो? असा प्रश्न प्रत्येकाने स्वतःस विचारायला हवा.

खुर्ची सोबत काही जबाबदाऱ्या आपल्या सोबत येतात त्यापैकी एक म्हणजे मोटिवेटर ची जबाबदारी. रणांगणात केवळ सैनिकं लढत नसतात तर सैनिकांची मनं लढत असतात आणि त्यांना मनातून प्रेरित करण्याचे काम त्यांच्या नेत्यांने सेनाप-तीने करायचं असतं. कार्यालयाच्या दर्शनी भागात भिंतीवर खालील घोषवाक्य कोरली पाहिजेत. क्या आज आपने किसीको मोटिवेट किया?
मोडला असेल संसार तरी मोडला नाही कणा पाठीवरती हात ठेवून फक्त लढ म्हणा. या जगाचं नुकसान वेगवेगळ्या आक्रमणांमुळं जेवढं झालं आहे त्यापेक्षा अधिक नुकसान मोटिवेशनच्या अभावी होत आहे. छत्रपती शिवरायांच्या शेलारमामांनी मावळ्यांना लढण्यासाठी मोटिवेट केले. मागे फिरा. मी कड्यावरचा परतीचा दोर कापून टाकला आहे. कड्यावरून उड्या मारा नाहीतर शत्रूवर तुटून पडा. ...आणि मावळे त्वेषाने लढले. सेनापती, मोटिवेटर म्हणून त्या वेळी आणि ठिकाणी हे करणे अतिशय योग्य होते.
कोणतेही राष्ट्र तोपर्यंत जलद गतीने पुढे जाऊ शकत नाही जोपर्यंत ते मोटिवेशन या मार्गाचा अवलंब करत नाही.

प्रशासक जर उंटावरून शेळ्या हाकण्याच्या भूमिकेत असतील तर ते काय उत्तम मोटिवेटर होऊ शकतात? प्रशासक स्वतःस प्रशासक न मानता जर कॉमन मॅन मानत असेल तर तो खऱ्या अर्थाने उत्तम मोटिवेटर होऊ शकतो. खुर्ची अंगात घुसता कामा नये. जाणकार तो शेतकरी महाधन खताची निवड करी या महाधन खताच्या कंपनीची जाहिरात आठवल्याशिवाय राहत नाही. होय! जाणकार प्रशासक संघटनेच्या हितासाठी मोटिवेशन मार्गाचा अवलंब करतातच. कोणत्याही संघटना प्रमुखाने असेच उमेदवार निवडले पाहिजेत जे हायली मोटिवेटेड असतील व मोटिवेट करू शकतील. मराठी भाषेत एक म्हण आहे, ढवळ्या शेजारी पवळ्या बांधला वाण नाही पण गुण लागला याप्रमाणे एका मोटिवेटेड कर्मचाऱ्यामुळे दुसरा कर्मचारी मोटिव्हेट् होण्यास नक्कीच मदत होते.

अमेरिकन उद्योग क्षेत्रात यशाच्या शिखरावर असलेल्या उद्योगपती अँण्ड्यू कारणीज यांना एकदा मुलाख-तीत विचारण्यात आले की आपल्याकडे ज्या गोष्टी आहेत त्यापैकी एक गोष्ट सोडून सर्वकाही काढून घेतले जाईल. तर ती गोष्ट कोणती असेल जी आपण स्वतःकडे ठेवून घ्याल? कारणीज यांनी तात्काळ उत्तर दिले माझा कर्मचारी वर्ग. होय बॉसचा मालकाचा आपल्या कर्मचाऱ्यांवर एवढा विश्वास असेल तर याने सुद्धा कर्मचारी अधिक मोटिवेट होतात
मोटिवेट केल्याचे व मोटिवेट झाल्याचे आश्चर्यकारक फायदे आहेत हे सांगण्यासाठी कुठल्या भविष्यवेत्त्याची गरज आहे काय? वर्तमान काळात तर सेल्फ मोटिवेटेड अर्थात स्वयंप्रेरित असण्याची अधिक आवश्यकता निर्माण झाली आहे. कारण ज्याचे पाय धरावे असे पाय मिळणे दुरापास्त झाले आहे. त्याप्रमाणे मोटिवेट करणारेही दुरापास्त होत चालले आहेत.

पूर्वी सरकारी नोकरीस लोक नको नको म्हणायचे कारण नोकरीस अधिक महत्त्वाचे स्थान नव्हते. सरकार आपल्या दारी येऊन बळं आपणास ओढून न्यायचे नोकरीसाठी. आज ही स्थिती बिलकुल राहिलेली नाही. आज अगदी उलट स्थिती झाली आहे. सरकार दरबारी व संस्थानिकांचे आज उंबरे झिजवावे ला-गतात, कित्येक पोर्टलवर अर्ज करावा लागतो प्रयत्नांची पराकाष्ठा करावी लागते. तरीही शासकीय नोकरी मिळणं अतिशय कठीण झालं आहे. तद्वत मोटिवेट करणार्या व्यक्तीसुद्धा खूप कमी प्रमाणात आढळतात. त्या जणू शोधाव्या लागतात. कदाचित त्यांच्या स्वतःच्या किंवा तुमच्या वैयक्तिक फायद्यासाठी तुम्हास मोटिवेट करतीलही मात्र सार्वजनिक हितासाठी सहसा कोणी मोटिवेट करताना आढळत नाही. हे वास्तव नाकारून चालेल काय? खेकड्याची वृत्ती ही केवळ खेकड्यातच आढळते असे नाही. खेकड्याची प्रजाती तर केवळ बदनाम झाली आहे. अख्खी खेकड्याची जमात माणसाच्या नावानं बोटं मोडत आहे. आम्ही बदनाम झालो तुमच्यामुळे म्हणून!
हा छंद जीवाला लावी पिसे
हा छंद जीवाला लावी पिसे
याप्रमाणे प्रत्येकास इतरांना मोटिवेट करण्याचा छंदच असला, जडला पाहिजे. हा छंद छंद नाही तर महाअभिमान आहे. नक्की. इतरांना मोटिवेट करण्याचा व स्वतः मोटिवेटेड राहण्याचा छंद असला पाहिजे आपणा प्रत्येकास. होय इतरांना मोटिवेट करण्यात वेगळाच आनंद आहे.
आम्ही जगात काही अशा व्यक्ती पाहिल्या ज्या निगेटिव्हिटीमध्ये सुद्धा पॉझिटिव्हिटी शोधतात. जसे आमच्या महाविद्यालयाच्या डॉ. मंथा पी.पी. प्रशासकाला ज्याच्या बाबत असे वाटते की हा मोटिवेट होऊ शकत नाही त्याच्याबाबत सुद्धा प्रशासकांनी सकारात्मक राहिले पाहिजे व त्यास मोटिवेट केले पाहिजे. मोटिवेशन च्या बाबतीत कधीही हार मानता कामा नये. आणि तुम्हाला जर संस्थेचं वाटोळं करायचं असेल तर एकच करा कोणासही मोटिवेट करू नका, मोटिवेशन वर विश्वास ठेवू नका. मोटिवेशनला आस्थापनेत जराही थारा देऊ नका. मोटिवेशन की ऐसी की तैसी म्हणा. अर्थात विनाशकाले विपरीत बुद्धी. मोटिवेशन या माध्यमाचा प्रभावी वापर न करणे म्हणजे विनाशकाले विपरीत बुद्धी होय.पि हळद अनं हो गोरी
अशी एक ऊक्ती आहे मराठी मध्ये. तद्वत ङ्ककर मोटिवेट हो मोटिवेट आण् जा पुढे संपूर्ण जगाचं भलं दडलंय मोटिवेट या चार अक्षरात. शेतकरी माझा, दौलतीचा राजा, मातीतून सोन काढतोय रं, समद्या जगाला पोसतोय रं, या काव्यपंक्ती शेतकऱ्यांना मोटिवेट करण्यासाठीच तर आहेत.




वस्तुस्थिति अशी आहे की आज आपल्या देशाला यह दिल मांगे मोर याप्रमाणे कधी नव्हती एवढ्या मोठ्या प्रमाणात मोटिवेटर्सची आवश्यकता आहे. तरच वाढता वाढता वाढे याप्रमाणे कार्यक्षमता वाढत जाईल.

**डॉ. गंगणे जीवन सुदामराव, लातूर**
९४२१३७१८७३

## मेरे पापा

दिनभर काम कर थके हुए हैं,
कभी मुह से ऊफ तक नहीं किया
जीवन में कई ठोकरें लगी
पर कभी रुके नहीं मेरे पापा
पैसे पास में कभी नहीं रहें
हमारी ख्वाईशों हमेंशा पुरा किया
मुह से कुछ बोले नहीं मेरे पापा
पर हमें कभी नाराज नहीं किया
बीमार पड्ने पर मेरे
रात-रात जगते रहें
रात-दिन मेहनत कर
इच्छाओं को हमारे
मेरे पापा पुरा करते रहें
मैने जो भी माँगा वह
देने के लिए दिन-रात
मेहनत करते रहें....
खुप टुटी हुई चप्पल पहने
मेहनत में हरपल रत रहें
उन्हें तकलिफ होती थी
हमारे खुशी के लिए सहते रहें
परेशानियाँ और दुःख के
प्रसंगों से हमेशा लढते रहें
मेरी ताकद बनकर मेरे पापा
हमेशा मुझे हौसला दिया
हर मुश्किल से लडने की
सिख हम सबको दिया
इसलिए हम
सबके हिरो
और हम
सबकी जान
है पापा



**मंडले पायल धनराज**
७२४९६१८८९७

## कबीरवाणी

**आछे / पाछे दिन पाछे गए**
**हरी से किया न हेत ।**
**अब पछताए होत क्या,**
**चिडिया चुग गई खेत ।।**

**भावार्थ:** वेळ कोणासाठीही थांबत नाही. म्हणून आ-लेला दिवस हा जाणार आहे, दिवसामागून दिवस जात राह-तात. अगदी तसेच चांगले दिवस आले, सुख प्राप्ती झाली की, आपण ईश्वराला विसरून जा-तो. जीवनामध्ये दुःख आले की ईश्वराची आठवण येते. त्यावेळी ईश्वराचे नाम स्मरण करत असतो. आणि तेंव्हा ईश्वराचा विसर पडला आहे अशी जाणीव होते. त्यावेळी पश्चात्ताप करून काही उपयोग होत नसतो. याची तुलना संत कबीरांनी शेतकऱ्या सोबत केली आहे. शेतकऱ्यांचे अगदी असेच आहे, शेतकऱ्याने आपल्या शेताकडे दुर्लक्ष केले की, पक्षी पीकं खाऊन टाकतात. म्हणजे शेतकऱ्यांना चांगल्या दिवसामध्ये शेतीचा विसर पडला की नुकसान होते. अगदी तशीच अवस्था सुखातील माणसाची आहे.

**डॉ.बालाजी गोविंद कारामुंगीकर**
**मो. ९८२३११२९०७**

विश्वसनीय बातम्यांचे एकमेश वृत्तपत्र
दैनिक
यशवंत



✦लातूर/धाराशीव/बीड/नांदेड ✦/शुक्रवार दि. १५ मार्च २०२४✦वर्ष ५२ वे✦अंक-१२२ ✦पृष्ठे८✦किंमत १रुपया ✦RNINO.39924/83 ✦OMD-426/2020-22✦

# वन नेशन-वन इलेक्शन : कोविंद समितीचा अहवाल राष्ट्रपतींना सादर



नवी दिल्ली : भारताचे माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या अध्यक्षतेखालील वन नेशन-वन इलेक्शन या विषयावरील उच्चस्तरीय समितीने राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मू यांना आपला अहवाल सादर केला.

हा अहवाल एकूण १८,६२६ पानांचा आहे. हा अहवाल २ सप्टेंबर २०२३ रोजी त्याच्या निर्मितीवर तज्ज्ञांशी चर्चा करून आणि १९१ दिवसांच्या संशोधनानंतर सादर करण्यात आला आहे.

या अहवालात लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्याची माहिती देण्यात आली आहे. दुस-या टप्प्यात, लोकसभा आणि राज्य विधानसभांच्या निवडणुकांच्या १०० दिवसांच्या आत नगरपालिका आणि पंचायतींच्या निवडणुका व्हाव्यात अशा प्रकारे नगरपालिका आणि पंचायती लोकसभा आणि राज्य विधानसभांशी जोडल्या जातील, असे सांगण्यात आले आहे.

वन नेशन-वन इलेक्शन या विषयावरील कोवदिं समिती देशात एकाच वेळी निवडणुका घेण्यासाठी घटनेच्या शेवटच्या पाच कलमांमध्ये दुरुस्तीची शिफारस करू शकते. प्रस्तावित अहवाल लोकसभा, राज्य विधानसभा आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आयोजित करण्यासाठी एकाच मतदार यादीवर लक्ष केंद्रित करेल. गेल्या सप्टेंबरमध्ये स्थापन करण्यात आलेल्या समितीला विद्यमान घटनात्मक चौकट लक्षात घेऊन लोकसभा, विधानसभा, नगरपालिका आणि पंचायतींच्या निवडणुका (पान ६ वर)

# जीएसटीमधून शेतकऱ्यांची सुटका करणार

नाशिक : नाशिकमध्ये कांदा मोठ्या प्रमाणावर पिकतो. मध्यंतरी कांद्याची निर्यातबंदी करून शेतक-यांवर अन्याय केला गेला. पण यावर एकाही वृत्तवाहिनीने बातमी दिली नाही. पण पंतप्रधान मोदी समुद्राच्या तळाशी जावोत किंवा आकाशात विमानात असोत, त्यांच्या मागे वृत्तवाहिनीचा कॅमेरा फिरत असतो. वृत्तवाहिन्या देशातील मूळ प्रश्नांना बगल देऊन इतर ठिकाणी लक्ष वळविण्याचे प्रयत्न करत असल्याचा आरोप राहुल गांधी यांनी नाशिकमधील भारत जोडो न्याय यात्रेत केला. यावेळी राहुल गांधी यांनी शेतक-यांच्या प्रश्नांना हात घालत त्यांना जीएसटीमधून बाहेर ठेवण्यासाठी प्रयत्न करू अशी ग्वाही दिली.

शेतक-यांच्या प्रश्नासह राहुल गांधी यांनी उद्योगपतींच्या कर्जमाफीवरही टीका केली. ते म्हणाले, मोदी सरकारने मागच्या



दहा वर्षांत उद्योगपतींचे १६ लाख कोटींचे कर्ज माफ केले. हे पैसे किती होतात? याचेही स्पष्टीकरण राहुल गांधी यांनी दिले. मनरेगाच्या योजनेसाठी वर्षाला ६५ हजार कोटी रुपये लागतात. त्यातून लाखो लोकांना रोजगार मिळतो. उद्योगपतींना माफ केलेले १६ लाख कोटी रुपये जर या योजनेसाठी वापरले असते तर २४ वर्षे ही योजना चालविता आली असती.

आम्ही ७० कोटींची शेतक-यांची कर्जमाफी केली होती. त्यातून लाखो शेतक-यांना दिलासा मिळाला. मात्र पंतप्रधान मोदी यांनी केवळ काही धनाढ्य लोकांसाठी १६ लाख कोटींची कर्जमाफी केली. देशातील ७० कोटी लोकांकडे जेवढी संपत्ती आहे, तेवढी संपत्ती या २० ते २५ धनाढ्य लोकांकडे आहे, असाही आरोप त्यांनी केला.

जीएसटीमधून शेतक-यांना बाहेर ठेवू

पहिले म्हणजे उद्योगपतींची कर्जमाफी करायची असेल तर शेतक-यांचीही कर्जमाफी करावी लागेल, तसेच स्वामिनाथन आयोगाच्या शिफारशी कायद्याने अमलात आणाव्या लागतील, पीक विमा योजनेची पुनर्रचना केली जाईल, चौथे म्हणजे शेतकरी जेव्हा कांदा विकण्यासाठी आणतो तेव्हा आयात-निर्यात धोरण बदलून त्याचे उत्पन्न घटविले जाते. (पान ६ वर)

# लोकसभा निवडणूक जाहीर होण्यापूर्वी मिळाले दोन नवे निवडणूक आयुक्त

नवी दिल्ली -: पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील तीन सदस्यीय समितीने १४ मार्च रोजी दोन निवडणूक आयुक्तांची नियुक्ती केली. ज्ञानेश कुमार आणि सुखबीर संधू (बलविंदर संधू ) यांची निवडणूक आयुक्त म्हणून निवड केली, असे काँग्रेस नेते अधीर रंजन चौधरी यांनी पॅनेलच्या बैठकीनंतर माध्यमांना सांगितले. आता या नावांवर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू अंतिम निर्णय घेतली. त्यानंतर अधिसूचना काढण्यात येणार आहे. दरम्यान या प्रक्रियेसंदर्भात आपण असंतुष्ट असल्याचे अधीर रंजन चौधरी यांनी सांगितले. निवडणूक आयुक्त अरुण गोयल यांनी राजीनामा दिल्यानंतर काही दिवसांनी नवीन नियुक्तीचा हा निर्णय घेण्यात आला आहे.

निवडणूक आयुक्तांच्या नियुक्तीसाठी नवीन कायद्यानुसार पुनर्गठन करण्यात आलेल्या या पॅनेलच्या पहिल्या नियुक्त्या आहेत. भारताच्या सरन्यायाधीशांना सोडून निवड समितीमध्ये आता पंतप्रधान, विरोधी पक्षनेते आणि नियुक्त केंद्रीय कॅबिनेट मंत्री यांचा समावेश आहे.

ज्ञानेश कुमार केरळमधील तर संधू पंजाबचे

ज्ञानेश कुमार हे केरळमधील तर सुखबीर संधू हे पंजाबमधील आहे. सुखविंदर संधू हे उत्तराखंडचे मुख्य सचिव आणि NH-I चे चेअरमन राहिले आहेत. ज्ञानेशकुमार १९८८ बॅचचे (पान ६ वर)

# आचारसंहिता लागू करण्याचा मार्ग मोकळा

नवी दिल्ली : केंद्रीय निवडणूक आयोगाच्या निवडणूक आयुक्त पदाच्या दोन रिक्त जागांवर ज्ञानेश कुमार आणि बलविंदर संधू यांची निवड झाल्याची माहिती काँग्रेस नेते अधीर रंजन चौधरी यांनी दिली. त्यामुळे आता कोणत्याही क्षणी आचारसंहिता लागण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, कायदा मंत्री अर्जुन राम मेघवाल आणि लोकसभेतील काँग्रेसचे नेते अधीर रंजन दास यांच्या समितीने या दोन्ही नावांना संमती दिल्याची माहिती आहे.

दरम्यान, अधीर रंजन चौधरी यांनी सांगितले की, केंद्रीय निवडणूक आयोगामध्ये आयुक्तपदाची एक जागा अगोदरच खाली होती. त्यातच केंद्रीय निवडणूक आयुक्त अरुण गोयल यांनी तडकाफडकी राजीनामा दिल्याने दुसरी जागाही रिक्त झाली होती. या दोन नव्या आयुक्तांच्या निवडीसाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली एक बैठक पार पडणार होती. या बैठकीसाठी ते निवडणूक प्रचार सोडून दिल्लीला दाखल झाले होते. ही निवड तत्काळ होणे गरजेचे होते कारण लोकसभा निवडणुकीपूर्वी या जागा रिक्त ठेवायच्या नव्हत्या. खरे तर ही बैठक सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या विरोधात जाऊन घेण्यात आली आहे, असा आरोप त्यांनी केला आहे. कारण, न्यायालयाच्या निर्णयानुसार निवडणूक आयुक्तांची निवड करणाऱ्या समितीमध्ये न्यायाधीशांचाही समावेश आहे. पण, सरकारने या प्रक्रियेतून न्यायाधीशांनाच वगळले आणि ज्ञानेश कुमार आणि बलविंदर संधू यांची निवडणूक आयुक्त म्हणून निवड करण्यात आली आहे.

अधीर रंजन चौधरी यांनी दिलेल्या माहितीनुसार, बैठकीस पंतप्रधान नरेंद्र मोद यांच्या व्यतिरिक्त केवळ केंद्रीय गृहमंत्री अमित शाह हेच होते. आयुक्तांच्या निवडीसाठी मीटिंग होण्याआधी मी एक छोटी यादी मागितली होती. त्यावेळी छोटी यादी सादर करावी असे सांगण्यात आले. कारण निवडीपूर्वी छोट्या याद्या बनवल्या जातात. त्यामुळेच मी ती यादी मागितली होती. ती यादी (पान ६ वर)

## पेट्रोल, डिझेल २ रुपयांनी स्वस्त

नवी दिल्ली : वृत्तसंस्था

लोकसभा निवडणुकीआधी केंद्र सरकारने सामान्यांसाठी एक दिलासादायक घोषणा केली असून, पेट्रोल आणि डिजेलच्या दरात कपात करण्यात आली आहे. पेट्रोल आणि डिजेलचे दर २ रुपयांनी कमी करण्यात आले. नवे दर शुक्रवार, दि. १५ मार्चपासून लागू होणार आहेत. केंद्रीय मंत्री हरदीप पुरी यांनी माहिती दिली.

सरकारने शुक्रवारपासून पेट्रोल आणि डिझेलच्या दरात २ रुपयांनी कपात करण्याचा निर्णय घेतला. याबाबत केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री पुरी म्हणाले की, पेट्रोल आणि डिझेलच्या किमती २ रुपयांनी कमी करून देशाचे पंतप्रधान (पान ६ वर)

# माजी राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील रुग्णालयात दाखल

नवी दिल्ली : देशाच्या माजी राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांची प्रकृती बिघडल्याने त्यांना उपचारासाठी पुण्यातील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. गेल्या काही दिवसांपासून प्रतिभाताई पाटील यांची प्रकृती बरी नव्हती.

काल त्यांना अधिकच अस्वस्थ वाटू लागले. त्यांना तातडीने कुटुंबीयांनी पुण्यातील रुग्णालयात दाखल केले. त्या भारताच्या पहिल्या महिला राष्ट्रपती होत्या. त्यांचे वय ८९ वर्षे आहे. त्यांनी भारताच्या पहिल्या महिला राष्ट्रपती म्हणून २००७ ते २०१२ पर्यंत कार्यभार भूषविला. त्यांना पुण्यातील रुग्णालयात अस्वस्थता जाणवल्यामुळे दाखल केले असून



डॉक्टर त्यांच्यावर उपचार करत आहेत.

त्यांची निवड जळगाव विधानसभा मतदारसंघातून झाली होती. त्यांनी २० वर्षे वेगवेगळ्या खात्यांची मंत्रिपदे सांभाळली आहेत. त्यांनी राज्यसभेच्या उपाध्यक्षा म्हणून जबाबदारी हाताळली. १९९१ साली त्या अमरावतीतून लोकसभेच्या सदस्य झाल्या. त्या सध्या पुण्यात स्थायिक झाल्या आहेत.

# निलेश लंकेच्या पक्षप्रवेशात मोठा तांत्रिक अडथळा, चाणाक्ष शरद पवारांनी मुद्दा हेरला

## अजितदादांचा गेम उलटवला

पुणे: राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात उभी फूट पडल्यानंतर मतदारसंघासाठी लागणाऱ्या निधीचे गणित लक्षात घेऊन अजित पवार यांच्यासोबत जाणारे पारनेर मतदारसंघाचे आमदार निलेश लंके हे गुरुवारी पुन्हा शरद पवार यांच्या गोटात सामील झाले आहेत. निलेश लंके यांनी पुण्यातील पक्षकार्यालयात शरद पवार यांची भेट घेतली. त्यानंतर पक्षप्रवेशानंतर रितसर पत्रकारपरिषद होते, तीदेखील पार पाडली. परंतु, या सगळ्यानंतर



निलेश लंके यांनी शरद पवार गटात प्रवेशच केला नसल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. अर्थात त्याला कारणही तसेच आहे. गेल्या काही काळात शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडल्यानंतर शिंदे गट आणि अजितदादा गटाने अदृश्य शक्तीच्या मदतीने एकाहून एक सरस कायदेशीर डावपेच खेळत अनुक्रमे उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांच्याकडून त्यांचे पक्ष हिसकावून घेतले होते. मात्र, आज शरद पवार यांनी या सगळ्याची (पान ६ वर)



**औरंगाबाद येथे भारतीय काँग्रेस कमिटीचे बुंलदतो माझे स्नेही खा.इम्रानभाई प्रतापगडी यांच्याशी होऊ घातलेल्या लोकसभा निवडणूक संदर्भात चर्चा करताना महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष श्री.मा.भा.ई.नगराळे, प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस श्री.मा.मोईजभाई शेख, श्री.मा.अब्दुल रेहेमान, निलंगा दर्गाचे विश्वस्त शहेजांदे साहेब इ.मान्यवर होते.**

# घड्याळ चिन्ह न वापरण्याचा सुप्रीम कोर्टाचा अजित पवार गटाला सल्ला

नवी दिल्ली : राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात फूट पडल्यानंतर अनेक महिने राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हे नाव आणि घड्याळ चिन्ह यावर दोन्ही गटांमध्ये वाद सुरु होता. अखेर बहुमताच्या आधारावर निवडणूक आयोगाने अजित पवार गटाला मूळ नाव आणि घड्याळ चिन्ह बहाल केले. तर शरद पवार गटाला तुतारी हे नवे चिन्ह दिले. मात्र याविरोधात शरद पवार गटाने सुप्रीम कोर्टात याचिका दाखल केली होती. आज या प्रकरणी सुनावणी पार पडली असून सुप्रीम कोर्टाने अजित पवार गटाला घड्याळ चिन्ह न वापरण्याचा सल्ला दिला आहे. सोबतच शरद पवारांचे फोटोही न वापरण्याची सूचना केली आहे.

सुप्रीम कोर्टाच्या सुनावणीदरम्यान, अजित पवार हे आमच्या लोकप्रियतेचा वापर करत असल्याचा दावा शरद पवार गटाने केला. शरद पवार यांचा फोटो आणि घड्याळ चिन्ह वापरण्यावरही त्यांनी आक्षेप नोंदवला. यावर सर्वोच्च न्यायालयाने शरद पवार यांचं नाव आणि फोटो तसेच घड्याळ चिन्ह वापरु नका, असे आदेश अजित पवार गटाला दिले आहेत.

काय म्हटलं आहे सर्वोच्च न्यायालयाने?

सुनावणीवेळी शरद पवार यांच्या नावाचा व छायाचित्राचा प्रत्यक्ष (पान ६ वर)

# कष्टकऱ्यांच्या जीवनात आनंद फुलवीण्यासाठी सर्व प्रकारच्या सुविधा पुरवण्याचा प्रयत्नः आ. अमित देशमुख



लातूर / प्रतिनिधी- लातूर शहराची सर्वांगीण प्रगती होत असताना, कष्टकऱ्यांच्या जीवनात, आनंद निर्माण करण्यासाठी, त्यांना अन्न, वस्त्र, निवारा यासह आरोग्य शिक्षण व इतर सर्व प्रकारच्या सुविधा पुरवण्याचा प्रयत्न राहील अशी ग्वाही दिली आहे.

लातूरच्या अर्थकारणाचा आत्मा असलेल्या उच्चतम कृषी उत्पन्न बाजार समितीचा लौकिक आणि वैभव वाढवण्यासाठी जे जे करणे शक्य आहे ते सर्व काही केले जाईल अशी ग्वाही राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्य मंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी मार्केट यार्ड आतील विविध विकास कामाच्या शुभारंभ गुरूवार दि. १४ मार्च रोजी करण्यात आला या प्रसंगी बोलतांना दिली.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आमदार धिरज देशमुख, माजी आमदार वैजनाथ शिंदे, माजी आमदार त्र्यंबकनाना भिसे, माजी सभापती ललितभाई शहा, विलास बँकेचे अध्यक्ष किरण जाधव, उपाध्यक्ष समद पटेल, ट्वेंटीवन शुगरचे उपाध्यक्ष विजय देशमुख, विलास सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष रवींद्र काळे, सभापती जगदीश बावणे, उपसभापती, सुनील पडीले, सचिव भगवान दुधाटे सर्व संचालक मंडळ, शेतकरी,ज्येष्ठ व्यापारी त्यांच्यासह बाजार समितीमधील सर्व घटकांचे प्रतिनिधी, मान्यवर मंडळी या यावेळी उपस्थित होते.

यावेळी पूढे बोलतांना राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्य मंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख म्हणाले, बाजार समितीमधील व्यवहारावर लातूर मधील इतर क्षेत्रातील व्यवसाय आणि व्यापार अवलंबून आहे त्यामुळे भविष्याचा विचार करून या ठिकाणी नव्याने सोयी सुविधा निर्माण करण्यासंदर्भात सर्वांच्या सूचना घेऊन संचालक मंडळांनी यापुढे निर्णय निर्णय घेऊन त्यावर लगेच अंमलबजावणी करावी. शेतीमाल निर्माण होऊन तो बाजारपेठेपर्यंत व्यवस्थित पोहोचण्यासाठी, ठिकाणी गोडाऊन, कोल्ड स्टोरेज, आणि वाहतुकीच्या व्यवस्था उभाराव्यात, बाजार समितीमार्फत मुलींचे वस्तीगृह बांधून पूर्ण झाले आहेत, हे वस्तीगृह (पान ६ वर)

# विद्वानांचा गौरव अभ्युदयाचे कारण : श्री काशी जगद्गुरू

## उषा पसारकर यांना भामती पुरस्कार प्रदान

वाराणसी : विद्वानांचे गुणगौरव केल्याने भक्तांचा अभ्युदय होतो असे विचार काशी जगद्गुरू डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी यांनी आपल्या आशीर्वचनात व्यक्त केले. वीरशैव धर्माच्या पंचपीठांपैकी ज्ञानपीठ म्हणून काशीपीठ प्रसिद्ध आहे. प्राचीन काळापासून काशी येथील जंगमवाडी मठामध्ये महाशिवरात्री निमित्त पूर्वसंध्येत विद्वानांचा गुणगौरव समारंभ संपन्न होतो. यावर्षी आयोजित केलेल्या विद्वत्सभेत महास्वामीजी आपल्या आशीर्वचनात म्हणाले. यावर्षीच्या पुरस्कारामध्ये पुढील विद्वानांचा समावेश होता.

श्री जगद्गुरू विश्वाराध्य विश्वभारती पुरस्कार : प्रोफेसर राजाराम शुक्ल कोडीमठ संस्कृत साहित्य पुरस्कार : दिव्य चैतन्य ब्रह्मचारी आचार्य व्रजवल्लभ द्विवेदी शैवभारती पुरस्कार : आचार्य रमाकांत पांडेय, लिं. सिंधू सुभाष म्हमाणे



मातृशक्ती पुरस्कार : प्रोफेसर स्वरवंदना शर्मा, जयदेवश्री हिंदी साहित्य पुरस्कार : सुप्रसिद्ध साहित्यिक आलोक पराडकर ,भामती पुरस्कार : डॉ. शे. दे. पसारकर यांच्या सुविद्य पत्नी उषा शेषनारायण पसारकर, केकतउमरा यांना देऊन सन्मानित करण्यात आले. सन्मानपत्र, शाल, श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

जगद्गुरू महास्वामीजींचे पंचाचार्य पंचसूत्राणि या मूळ संस्कृत ग्रंथाचा हिंदी पद्यानुवाद प्रोफेसर वागिष दिनकर यांनी केला आहे. याचे प्रकाशन या शुभप्रसंगी करण्यात आले. तसेच डॉ. ददन उपाध्याय यांच्या मवीरशैव आचार्य परंपरा विमर्शफ या हिंदी ग्रंथाचे लोकार्पण करण्यात आले. या कार्यक्रम प्रसंगी काशीपीठाचे लहान जगद्गुरू डॉ. मल्लिकार्जुन विश्वाराध्य महास्वामीजी उपस्थित होते. याप्रसंगी महास्वामीजी म्हणाले, विद्वानाला ईश्वराचे प्रत्यक्ष रूप मानले जाते. म्हणून प्रत्येक क्षेत्रातील विद्वानांचा गौरव केला पाहिजे. (पान ६ वर)

# संपादकीय

## शेअर बाजाराची चित्तरकथा

गेल्या पंधरवड्यात शेअर बाजाराचा निर्देशांक सुमारे एक हजार अंकांनी वाढून ७४ हजारांच्या उंबरठ्यावर उभा राहिला, तर बीएसई स्मॉलकॅप्स निर्देशांक सुमारे हजार अंकांनी कमी होऊन ४५५०० च्या आसपास वर पोहोचला. बाजारात काही दिवस थोडी घसरण बघायला मिळाली; पण लवकरच बाजाराने उसळी घेतली. याचे मुख्य कारण म्हणजे तिसऱ्या तिमाहीमध्ये जीडीपीमध्ये झालेली ८.४ टक्क्यांची घसघशीत वाढ. सर्व विश्लेषकांना आणि सरकारलाही ७.६ टक्क्यांची वाढ अपेक्षित असताना वाढीचे त्याहून जास्त आकडे समोर आल्याने सगळ्यांनाच आश्चर्याचा सुखद धक्का बसला. युरोप अमेरिकेमध्ये, तसेच बाकी देशांमध्ये असलेल्या मंदीसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर ही वाढ अद्भुत आणि विलक्षणच म्हणावी लागेल. भारतीय अर्थव्यवस्थेची प्रचंड वेगाने सुरू असलेली ही घोडदौड पुढील काही वर्षे कायम राहण्यासाठी अनेक सकारात्मक घटक काम करत आहेत.

गेल्या आठवड्यात झालेली आणखी एक महत्त्वाची घोषणा म्हणजे सरकारने १.२६ लाख कोटी खर्चाच्या तीन सेमीकंडक्टर प्रकल्पांना दिलेली मंजुरी. सेमीकंडक्टरच्या उत्पादनात तैवान, दक्षिण कोरिया, जपान आणि अमेरिका हे चीनच्या समोर असले, तरी निर्यातीत मात्र चीन पहिल्या स्थानावर आहे. त्यामुळे कोविडकाळात चीनची निर्यात खूप घटल्याने सेमीकंडक्टरचा प्रचंड तुटवडा निर्माण झाला होता आणि विद्युत गाड्या, टेलिकॉम, इलेक्ट्रॉनिक्स, ऑटोमोबाईल आणि संरक्षण या क्षेत्रांना मोठी झळ सहन करावी लागली. बऱ्याच नवीन मोटारगाड्यांसाठी ग्राहकांना वर्षभराच्या प्रतीक्षाकाळाला सामोरे जावे लागले. कुठल्याही देशाला संरक्षण क्षेत्रामधील परावलंबिता परवडणारी नसते. आता सरकारने या अतिमहत्त्वाच्या उत्पादनात स्वयंपूर्ण होण्यासाठी तातडीची पावले उचलली असून, या घोषणेच्या आधीही फॉक्सकॉनसारख्या विदेशी कंपन्यांनी भारतात सेमीकंडक्टरच्या उत्पादनाची घोषणा केली आहे. जागतिक स्तरावर अनेक देशांच्या अर्थव्यवस्था सद्य:स्थितीत अडचणीत आहेत. त्या पार्श्वभूमीवर भारतीय अर्थव्यवस्थेची मजबूत स्थिती, केंद्रात स्थिर सरकार, व्यवसायाभिमुख धोरणे आणि मोठी स्वदेशी बाजारपेठ या सर्व बाबींमुळे बहुराष्ट्रीय कंपन्यांसाठी भारत हा चीनला मजबूत पर्याय म्हणून समोर आला आहे. त्यातच चीनच्या अपारदर्शी एकाधिकारशाही सरकारच्या तुलनेत भारताचे लोकशाही सरकार युरोपीय आणि अमेरिकन कंपन्यांना जास्त भावते. या सर्व कारणांमुळे भारतीय उद्योगक्षेत्रात परकीय गुंतवणुकीचा ओघ उत्तरोत्तर वाढत चालला आहे. ॲपल, मायक्रोसॉफ्ट, गुगलसारख्या अमेरिकन कंपन्या, मध्यपूर्व आणि दक्षिणपूर्वेच्या देशांच्या कंपन्या आता भारतात अधिकाधिक गुंतवणूक करण्यासाठी उत्सुक आहेत.

## यंदाचे ऑलिम्पिक आव्हानात्मक

बदलते क्रीडा विश्व : शैलेंद्र रिसबूड, डोंबिवली

दुखापतीमुळे गेला काही काळ बॅडमिंटन कोर्टपासून दूर असलेल्या दोन वेळच्या ऑलिम्पिक पदकविजेत्या पीव्ही सिंधूने दमदार पुनरागमनाचे ध्येय बाळगले आहे. यावर्षी पॅरिस येथे होणाऱ्या ऑलिम्पिकमध्ये पदक कमाई करणे आव्हानात्मक असेल याची सिंधूला जाणीव असून सुवर्णयश मिळण्यासाठी आपल्याला अधिक हुशारीने खेळ करावा लागेल असे तिला वाटते. यासाठी अनुभवाची शिदोरी फायदेशीर ठरेल असे सिंधू म्हणाली.

माजी जगज्जेत्या सिंधूला गेल्या १८ महिन्यांत लौकिकाला साजेशी कामगिरी करता आलेली नाही. त्यातच तिला दुखापतींचाही सामना करावा लागला आहे. २०२२च्या राष्ट्रकुल स्पर्धेत तिच्या डाव्या पायाला दुखापत झाली होती. त्यातून पूर्णपणे सावरणार इतक्यात गेल्या वर्षी ऑक्टोबरमध्ये तिच्या डाव्या गुडघ्याला दुखापत झाली. त्यामुळे तिला बॅडमिंटन कोर्टपासून दूर राहावे लागले. २०१६ आणि २०20 च्या तुलनेत यंदा पॅरिस येथे होणारी ऑलिम्पिक स्पर्धा वेगळी आणि अधिक आव्हानात्मक असेल. मात्र, माझ्या गाठीशी आता पूर्वीपेक्षा अधिक अनुभव आहे. यंदा यशस्वी कामगिरी करण्यासाठी मला अधिक हुशारीने खेळावे लागेल असे सिंधू म्हणाली.

महिला विभागातील अव्वल १०-१५ खेळाडू या तुल्यबळ आहेत. त्यामुळे समोर कोणतीही खेळाडू असो, विजय मिळवणे सोपे नसते. तुम्हाला लक्षपूर्वक खेळ करावा लागतो. तुमची पहिली योजना यशस्वी ठरत नसल्यास दुसऱ्या पर्यायाचा विचार करावा लागतो. तगड्या प्रतिस्पर्ध्याविरुद्ध खेळताना काही वेळा काय करावे हे तुम्हाला सुचत नाही. अशा वेळी संयम राखणे महत्त्वाचे असते. त्यासाठी तुम्ही मानसिकदृष्ट्या कणखर असणे आवश्यक आहे, असेही सिंधूने नमूद केले.

सिंधूने २०१६च्या रिओ ऑलिम्पिकमध्ये रौप्य, तर २०२०च्या टोक्यो ऑलिम्पिकमध्ये कांस्यपदक पटकावले होते. मात्र, गेल्या काही काळापासून ती अपयशाच्या गर्तेत अडकली आहे. गेल्या वर्षी तिला बहुतांश स्पर्धांमध्ये पहिल्याच फेरीत पराभव पत्करावा लागला होता.

ज्यांच्या शोधामुळे जगाची जगण्याची दिशा बदलली असे जागतिक कीर्तीचे थोर शास्त्रज्ञ यांची नवीन अभ्यास पिढीला माहिती व्हावी व त्याद्वारे प्रेरणा मिळावी या हेतूने संक्षिप्त स्वरुपात दरदिवशी किंवा सोईप्रमाणे एका शास्त्रज्ञांची माहिती आम्ही प्रकाशित करीत आहोत. यासंदर्भात आपली प्रतिक्रिया अपेक्षित आहे.

– संपादक **यशवंत** लातूर

## ॲलेसांड्रो व्होल्टा ४७



ॲलेसांड्रो व्होल्टा

विद्युत दाबाचा शोध लावणारा थोर इटालियन शास्त्रज्ञ ॲलेसांड्रो व्होल्टाचा जन्म १८ फेब्रुवारी १७४५ रोजी इटलीतील कोमो गावात झाला. शालेय व महाविद्यालयीन शिक्षण सुविधा त्याच्या मध्यमवर्गीय कुटुंबामुळे त्याला प्राप्त झाल्या व सतराव्या वर्षीच तो पदवी परीक्षा पास झाला. त्यानंतर मात्र उच्चशिक्षणाची सोय त्या गावात नसल्याने व्होल्टाने सोळा वर्षे शिक्षक म्हणून नोकरी केली.

वयाच्या पस्तीसाव्या वर्षानंतर पॅव्हिया युनिव्हर्सिटीमध्ये फिजिक्स डिपार्टमेंटमध्ये व्होल्टा यांची नियुक्ती करण्यात आली. तेथे त्यांना संशोधन करण्याची परवानगीही देण्यात आली. मग केवळ संशोधनासाठीच त्यांनी आपले आयुष्य झोकून दिले.

स्थिरविद्युतमापनासाठी व अन्य प्रयोगासाठी उपयुक्त ठरेल असे जे उपकरण वापरले जाते ते 'इलेक्ट्रोफोरस' हे व्होल्टांनी तयार केले. सध्या सतत वापरल्या जाणाऱ्या 'कपॅसिटर' च्या बनावटीचा इलेक्ट्रोफोरम हा पाया होय.

इलेक्ट्रोफोरम प्लेटमधील अंतर वाढवून व त्यावर विद्युतभार देऊन व्होल्टाने सूक्ष्म संवेदना मोजण्यासाठी उपयुक्त असे उपकरण बनविले, त्यास 'मायक्रो इलेक्ट्रोस्कोप' असे नाव देण्यात आले. अनेक प्रयोग करता करता एकदा त्याने आपल्या जिभेच्या टोकावर एक कथलाची पट्टी टेकविली. नंतर चांदीच्या चमच्याने एक टोक जिभेच्या आतच्या भागावर टेकवलं व दुसरं टोक कथलाच्या पट्टीच्या बाहेरच्या टोकाला लावले, तर त्याने असे अनुभवले की जिभेच्या टोकावर आंबट चव लागून रिवरिवल्यासारखे झाले. यावरून व्होल्टाने निष्कर्ष काढला की विद्युतनिर्मिती दोन असमान धातूंपासून निर्माण झाली. या आपल्या प्रत्यक्ष अनुभवाच्या जोरावर व्होल्टाने गॅल्व्हानीच्या सिद्धांतात दुरुस्ती सुचविली व इलेक्ट्रोकेमिस्ट्री म्हणजेच 'विद्युतरसायन' या शास्त्राचा पाया घातला. यानंतर थोड्याच कालवधीनंतर व्होल्टाने सर्व जगात मान्य झालेला असा 'व्होल्टाझ पाईल' हा सिद्धांत मांडला. लंडनच्या रॉयल सोसायटीने सन १८०० मध्ये या संशोधनास प्रसिद्धी दिली. या यशस्वी संशोधनामुळे पुढे ड्राय सेल्स म्हणजे 'विजेऱ्या' निर्माण झाल्या. अशा बॅटऱ्यांचा उपयोग रेडिओ, ध्वनियंत्रे व अनेक उद्योगधंद्यांमध्ये होऊ लागला. म्हणजेच पुढील शंभर-दीडशे वर्षातील विद्युतसंशोधनाची मुहूर्तमेढच

## शरीर अशक्त झालेय, नेहमीच जाणवतो थकवा; या पोषक घटकांची कमतरता आहे का?

मुंबई आपल्या शरीराला दररोज विविध प्रकारच्या पोषक घटकांची आवश्यकता असते. जी सामान्यत: अन्नातून मिळते. शरीरात एकाही पोषक घटकाची कमतरता असल्यास शरीर अशक्त होते आणि अनेकदा थकव्याचा सामना करावा लागतो. भारतातील अनेकांना जीवनसत्त्वाच्या कमतरतेचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे आपणही वेळीच सावध व्हायला हवे. भारतातील प्रसिद्ध पोषण तज्ज्ञ निखिल वत्स यांनी सांगितले की, बरेचसे निरोगी दिसणारे लोक आंतरिकदृष्ट्या कमकुवत असतात.जीवनसत्त्वांचे अनेक प्रकार आहेत - अ, इ, उ, ऊ, ए आणि घ. प्रत्येक पोषक घटकाचे स्वत:चे महत्त्व असते आणि त्याचा शरीराला फायदा होतो. त्यांच्या कमतरतेमुळे शरीर कमकुवत होते, हाडे आकुंचन पावू लागतात, स्नायूंनाही वेदना जाणवू लागतात. अशीही अनेक प्रकरणे आहेत ज्यात त्वचा कोरडी आणि सैल होऊ लागते, तसेच डोक्याचे केस देखील कमकुवत होतात. कोणत्या लोकांना अधिक जीवनसत्त्वे आवश्यक आहेत?कोणतीही व्यक्ती जीवनसत्त्वाच्या कमतरतेचा बळी ठरु शकते, तरीही वृद्ध आणि गर्भवती महिलांना याचा जास्त धोका असतो. या आजाराात काही औषधे घेतल्यास पोषक तत्वांची कमतरता होऊ शकते. याशिवाय जर तरुणांनी आरोग्यदायी पदार्थांऐवजी उलटे काहीही खाण्यास सुरुवात केली तर त्यांच्यात जीवनसत्त्वे आणि इतर पोषक तत्वांचीही कमतरता भासते.जर तुमच्या शरीरात पोषक तत्वांची कमतरता असेल तर त्यावर मात करण्यासाठी मल्टीविटामिन सप्लिमेंटस घेऊ शकतात. याच्या सेवनाने जीवनसत्त्वांची कमतरता तर दूर होईलच, शिवाय शरीराला क्रोमियम, झिंक, सेलेनियम, लोह, पोटॅशियम, कॅल्शियम आणि मॅग्नेशियम यांसारखी खनिजेही मिळतील.मल्टीविटामिन खाण्याचे फायदे

मल्टीविटामिन्स खाल्ल्याने शरीराला प्रचंड ऊर्जा मिळते, यामुळे तुमचे शरीर आणि मज्जासंस्था सुधारते आणि रोगप्रतिकारशक्ती वाढण्यास मदत होते. महामारीच्या काळातही तुमचे संरक्षण आहे. जर तुम्हाला पाय, शरीर आणि हात दुखत असतील तर मल्टीविटामिन तुमच्यासाठी रामबाण उपाय ठरु शकतो.

## उपदेशकथा :काटकसर




ही गोष्ट आहे १९४३ मधली. तेव्हा पुण्याच्या आगाखान पॅलेस मध्ये महात्मा गांधीजी स्थानबद्ध होते. तेथे गांधीजींसह त्यांची नात मनुबेनही होती. मनुबेनला तेव्हा अभ्यासाला एक वही हवी होती. म्हणून तिने कारागृहाच्या अधिकाऱ्यांकडून एक वही मागवून घेतली. ती वही जेव्हा गांधीजींनी पाहिली तेव्हा ते रागावले तिच्यावर! ते म्हणाले, 'मनू अभ्यास करायलाही एवढ्या पक्क्या बांधणीची अन् दीड रुपयाची महाग वही कशाला ग हवी? हे बघ, हे पैसे काही विलायतेहून नाही येत. आपले भारतीय लोकच जो कर भरतात ना. त्यातूनच खर्च होत असतो हा सगळा! तेव्हा अशी उधळपट्टी करणं आपल्याला मुळीच शोभत नाही. आताच्या आता जा, अन ही वही परत कर. अंग मी नाही का कॅलेंडरच्या जुन्या कागदांच्या पाठकोऱ्या बाजूवर लिहीत. मग तुला काय होते तसे करायला? यापुढे असे होता कामा नये. आले लक्षात?'कथा उपदेश : काटकसर करण्याची सवय लहानपणापासून लावायला हवी.

## सुविचार

**ज्याला आपल्या पापांचा पश्चात्ताप झालेला असतो तो जवळजवळ निष्पापच समजावा.**

**– सिनेका**


**संस्कृत सुभाषित**

कल्पतरू खाली ।
फळे येती मागितली
तेथे बैसल्याचा भाव ।
विचारूनी बोले ठाव ।
द्यावे ते उत्तर ।
येतो प्रति त्याचा फेर
तुका म्हणजे मनी ।
आपुल्याच लाभ हानी ।

संस्कृत सुभाषित

खल: कापट्या दोषेन दूरेणैव विसृज्यते ।
अपाय रांकिमिलौके विषेणाशी विषो यथा ।

## सर्वांमध्ये प्रिती तत्व – ओशो



आपल्या प्रत्येकात 'प्रिती' नावाचे तत्व आहे, ज्याच्या आधारावर आपण जगतो. आपण चुक जगत असलो तरी 'प्रिती'च्या आधारावर जगत असतो.

पैसे कमावणाऱ्याची पैशांवर प्रिती असते. कुणी पदाच्या मागे धावत असेल पद गौण आहे पण प्रतिष्ठेवर प्रिती आहे. जिथे शोधाल तिथे तुम्हाला प्रिती सापडेल. कुणी वेश्यालयात गेले व एखाद्याने कुणाची हत्या केली. पापी माणसात व पुण्यात्मातही तुम्हाला प्रिती एकसाथ पाहण्यास मिळेल. मग प्रिती कुणासोबत झाली, त्याचे प्रकार पडतात. पैशावर लागली तर तुम्ही पैसेच होऊन जातात. कागदाच्या सडक्या नोटा होऊन मरतात.


हे मोठे पायाभूत सत्य आहे, यास हृदयात सांभाळून ठेवा. प्रिती महागडा सौदा असल्याने कुणासोबतही करु नका. प्रितीचा अर्थ - मी हे होऊ इच्छितो, असा होतो. राजनेता गावात आले व तुम्ही एकत्र जमून त्यांचे स्वागत केले. का केले? कारण तुमची इच्छा असते की, माझ्याकडेही पद असावे, प्रतिष्ठा असावी म्हणून पद व प्रतिष्ठेची पूजा आहे. एखादा भिकारी गावात आला व तुम्ही पोहोचले. त्याच्यासोबत तुमची प्रिती असल्याचे वृत्त मिळते की, भिकारी होण्यासाठी आतूर आहेस-कधी येईल तो मुक्तीचा क्षण, जेव्हा सर्व सोडून... कुठल्याही वस्तूवर माझी पकत्रड राहणार नाही. कुणी संगीत ऐकले तर हळुहळु त्याच्या हालचालीत संगीत दिसू लागते. तुम्ही ज्यावर प्रिती कराल तसे व्हाल.

प्रिती तत्वात रसायन असून प्रितीशिवाय कुणी राहू शकत नाही. प्रिती श्वासाप्रमाणे गरजेची आहे. जसे शरीर श्वासावर जगते, आत्मा प्रितीवर जगतो म्हणून जर तुमच्या जीवनात प्रिती नसेल किंवा तुमचा प्रितीचा सेतू तुटेल तेव्हा तुम्ही आत्महत्या कराल. घरास आग लागली व सर्व पैसे जळाले आणि तुम्ही आत्महत्या केली. तुम्ही म्हणतात की, हे घरच मी होतो व हेच माझी प्रिती होती. आता हेच नसल्यावर माझ्या राहण्यास काय अर्थ! तुमची पत्नी मरण पावली व तुम्ही आत्महत्या केली. तुम्ही म्हणतात की, तिच माझ्या प्रितीचा आधार होती. माझा संसार उद्ध्वस्तच झाला. आता माझा जगून काही उपयोग नाही.आपण प्रितीशिवाय जगू शकत नाही. जसे श्वासाविना शरीर राहत नाही तसे प्रितीविना आत्मा राहत नाही. मग चुकीने प्रिती झाली तरी आत्मा टिकून राहते.

प्रितीचे अनेक प्रकार लक्षात घेतले पाहिजे. एक प्रिती जी तुमच्या पत्नीवर असते, मित्रांवर असते, पतीवर असते, भाऊ-बहिणीत असते. त्या प्रितीला आपण प्रेम संबोधतो. आणखी एक प्रिती असते. जी आई-वडिल किंवा गुरुंप्रती असते, त्यास श्रद्धा म्हणतात.

कुणी तुमच्यापेक्षा मोठे आहे. प्रितीला डोंगरावर चढावे लागते म्हणून श्रद्धा कठीण असते. श्रद्धेत डाव खेळावा लागते. श्रद्धेत चढाई असल्याने फार कमी लोकांमध्ये पाहण्यास मिळते. आई-वडिलांवर कोण प्रिती करतो! लोक कर्तव्य पार पाडताना दिसतात. मग प्रिती कुठे गेला? आपल्यापेक्षा मोठ्यांवर प्रिती करण्यात डोंगर चढण्याची हिम्मत असायला हवी व लक्षात ठेवा की, तुम्ही आपल्यापेक्षा मोठ्यांवर जेवढी प्रिती कराल तेवढे तुम्ही वर जाल. तुमच्या चेतना ऊर्ध्वगामी होतील म्हणून आम्ही श्रद्धेला खुप महत्व देतो. श्रद्धा माणसाला बदलते.ज्याच्या जीवनात श्रद्धा नाही त्याच्या जीवनात विकास नसतो. आपल्यापेक्षा छोट्यांवर असलेल्या प्रितीस स्नेह म्हणतात. छोट्यांप्रती सच्ची प्रिती तेव्हाच होऊ शकते जेव्हा आपली मोठ्यांवर श्रद्धा असते. ज्या व्यक्तीच्या जीवनात आपल्यापेक्षा मोठ्यांप्रती श्रद्धा आहे, सम्यक श्रद्धा आहे, त्या व्यक्तीच्या जीवनात आपल्यापेक्षा छोट्यांप्रती सम्यक स्नेह असतो व त्या व्यक्तीच्या जीवनात आमुलाग्र बदल होतो-आपल्या समवयीनांप्रती सम्यक प्रेम असते. त्याच्या जीवनात प्रेमाचा छंद बांधला जातो.

## राशी भविष्य



राशीभविष्य

१५ मार्च २०२४ (पीएसआय)

मेष : शुभ रंग:काळा, शुभ दिशा:पूर्व
आयुष्याला वळण देणारे ठरावेत असे प्रस्ताव आपले उत्पन्नही वाढविणारे ठरतील. वृद्धांच्या तब्येती सांभाळा.

वृषभ : शुभ रंग : पांढरा, शुभ दिशा : पश्चिम
कोणत्याही वादविवादात मध्यस्थी करू नका. शब्दप्रयोग व पैसा यांचा वापर विचारपूर्वक करा.

मिथुन : शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा:पूर्व
तब्येतीची प्रसन्न साथ, घरातले मंगल वातावरण, नशीबाची अनुकूल साथ हे सर्व कसे चांगले जमून येणार आहे.

कर्क : शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा:उत्तर
नोकरीच्या अपेक्षा असणाऱ्यांना अपेक्षित अशी नोकरी मिळेल. नोकरदारांना नोकरीतील बदल लाभदायक ठरतील.

सिंह : शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा:पूर्व
घरगुती आजारपण, नाराज शेजारी, पाहुण्यांचे मुक्काम आणि स्वत:ची कामाची घाई यातून वेळ काढावा लागेल.

कन्या : शुभ रंग: हिरवा, शुभ दिशा : उत्तर
मामा, मावशी किंवा सासुरवाडीचे व्यवहार बिघडू देऊ नका. मुलांच्या वागण्याकडे लक्ष ठेवा.

तुळ : शुभ रंग:निळा, शुभ दिशा:पूर्व
मैत्रिणीसह होणाऱ्या गप्पातून ज्ञानात भर पडेल. काही वैचारिक चर्चा हितकारक ठरतील.

वृश्चिक : शुभ रंग:गुलाबी, शुभ दिशा:पश्चिम
घरात कुटुंबियांच्या तब्येती व काही विचित्र प्रश्न यातून सफाईने मार्ग काढावा लागेल.

धनु : शुभ रंग : काळा, शुभ दिशा : पूर्व
अनाठायी खर्च टाळा. खर्च करताना आपण काही अनिष्ट गोष्टींना खतपाणी घालत नाही ना याची काळजी घ्या.

मकर : शुभ रंग : पिवळा, शुभ दिशा : पूर्व
घरात काही मंगलकार्ये ठरतील. कार्यक्रमानिमित्त घरात पाहुण्यांची वर्दळ राहील.

कुंभ : शुभ रंग : हिरवा, शुभ दिशा : उत्तर
जुन्या आठवणी, नव्या मित्रांची संगत यातून भरीव कामगिरी करू शकाल. सासू:सुनांतील दुरावा कमी करा.

मीन: शुभ रंग : लाल, शुभ दिशा : उत्तर
प्रवासातून चांगले अनुभव आपल्या व्यवसायात बदल करायला लावतील. संततीशी वादाचे प्रसंग येतील.

१५ मार्चला जन्मलेल्या लोकांचा भविष्य

स्वभाव : तुमच्या जन्मतारखेवर सुर्य, बुध, शुक्र व नेपच्यूनचा प्रभाव आहे. नेतृत्वाचे गुण तुमच्या अंगी जन्मजातच असतात. कोणत्याही क्षेत्रात आपले स्थान अव्वल दर्जाचेच असावे असा तुमचा आग्रह असतो. साहित्य व कलांची तुम्हाला आवड असते. त्याचा नुसता आस्वाद घेउनच तुम्ही थांबत नाही तर त्यात नैपुण्यही संपादन करता. जीवनाकडे बघण्याची तुमची वृत्ती रसिक, सौदर्यासक्त अशी असते. उंची वस्त्रे, अलंकार, नटणे मुरडणे यांची तुम्हाला आवड असते. सुखोपभोग व बौध्दीक आनंद यांना तुम्ही सारखेच महत्व देता. ऐश्वर्यात रहावे अशी तुमची मनापासून अपेक्षा असते.

पैसा हा जीवनाला आवश्यक असतो याबद्दल वादच नाही. पण त्याचा जास्त हव्यास अस्वस्थतेला कारणीभूत होईल. जुगारी प्रवृत्ती, विनासायास धनप्राप्तीच्या मागे लागल्यास नुकसान होईल. विलासाचा अतिरेक किडनीचे विकार, पोट व कंबरेची दुखणी यांना जन्म देईल. धूम्रपान, मद्यपान, प्रलोभने यापासून दूर राहा.

कार्यक्षेत्र : माणसाचे जीवन अधिकाधिक संपन्न व समृध्द बनवणाऱ्या चैनीच्या वस्तू, सुंगधी द्रव्ये, सौदर्यप्रसाधने यांच्या व्यापारात वा कारखान्यात तुमचा उत्कर्ष लवकर होऊ शकतो. तुमच्या कलानैपुण्याला वाव मिळेल अशी नाटक चित्रपट दूरदर्शनसारखी माध्यमेही अनुरूप ठरतील. हिरे, मोती इ. रत्नांच्या एजन्सी, पंचतारांकित हॉटेल्स वा खाद्यपुरवठा इ. क्षेत्रात प्रगती होईल.

प्रणयी जीवन : आकर्षक, मोहक व्यक्तींबद्दल तुम्हाला मनापासून आकर्षण वाटते. रेखीव चेहरा, टवटवीत कांति, बांधेसूद शरीरयष्टी याला तुम्ही महत्व देता. आपल्या जोडीदाराने आपल्या भावनांना तितकाच उत्कट प्रतिसाद द्यावा अशी तुमची अपेक्षा असते. एकलकोंडी, घुम्या स्वभावाची माणसे तुम्हाला आवडत नाहीत. रसिक जोडीदार तुम्हाला २१ एप्रिल ते २० मे दरम्यान जन्मलेल्या व्यक्तीत सापडू शकेल.वर्षफळ : अनावश्यक टीका टिपणी, अनाहूत प्रतिक्रीया टाळा. नाहीतर देवघेवीचे व्यवहार फिसकटतील. आर्थिक प्राप्तीत अधूनमधून खंड पडण्याची शक्यता आहे. जानेवारी फेब्रुवारी मध्ये भागीदारीच्या व्यवहारात यश मिळेल. मे जून मध्ये मंगलकार्ये ठरतील. प्रकृती सांभाळा. जुलै ऑगस्ट मध्ये प्रमोशन बढतीची शक्यता आहे. स्पटेंबर मध्ये व्यवसायात जम बसेल. ऑक्टोबर नोव्हेंबर मध्ये जागा खरेदीचे बेत ठरतील. राजकीय क्षेत्रात उत्कर्ष होईल.

महत्वाचे वर्ष : ६, १५, २४, ३३, ४२, ५१, ६०, ६९.

भाग्यरत्न : हिरा

याच तारेखेची व्यक्ती : कृष्णाजी केशव दामले

हे पत्र मालक, मुद्रक व प्रकाशक **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे** यांनी मे. यशवंत प्रिंटींग प्रेस, ५१, एमआयडीसी, लातूर येथे छापून दैनिक यशवंत कार्यालय, गांधी मार्केट, लातूर येथे प्रसिध्द केले. शहर कार्यालय-गांधी मैदान, लातूर,दूरध्वनी-२४६९४६, मुख्य कार्यालय -५१, एमआयडीसी, लातूर, दूरध्वनी-२२०२४६,फॅक्स(०२३८२)२२०१४१, उस्मानाबाद कार्यालय दूरध्वनी-(०२४७२)२२८९१२, सोनवणे : ९४०२९ ४९६०७ परभणी कार्यालय - दूरध्वनी - २२१४५३, उदगीर कार्यालय-(०२३८५) २५३९९८.राम मोतीपवळे : ८५०२२८२४० (अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखातील विचाराशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
संस्थापक संपादक-**प्रा.बी.व्ही.मोतीपवळे,** संपादक - **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे ईमेल** : dailyyashwant@gmail.com, omj7@rediffmail.com

# गरिबांचा फ्रीज आलाय बाजारात



शिरूरआनंतपाळ : थंडी आता पूर्णपणे ओसरली असून, उन्हाच्या झळा चांगल्याच जाणवू लागल्या आहेत. त्यामुळे नागरिकांना आता थंड पाण्याची आवश्यकता भासू लागली आहे. गरिबांचा फ्रीज म्हणून संबोधल्या जाणाऱ्या माठाचे येरोळ येथील बाजारात आगमन झाले आहे. यात गरिबांचा फ्रीज म्हणून मातीचे माठ सर्वांनाच परिचित आहे. उन्हाळ्यात मातीच्या माठातील पाणी शरीराला थंडावा देते. याशिवाय आरोग्यासाठीही लाभदायक असल्याने अगदी सर्वच स्तरातील नागरिक मातीचे माठ खरेदी करणे पसंत करतात. उन्हाच्या झळा जाणवू लागल्या आहेत. उन्हाचा पारा वाढत असल्यामुळे नागरिकांना आता थंड पाण्याची आवश्यकता भासू लागल्याने माठाची मागणी वाढली आहे.

मात्र बदलत्या काळानुसार थंडगार पाण्याच्या माठाची जागा आरो वॉटर मशीन, मिनरल वॉटर, पाण्याचे पाऊच, पाण्याचे जार, थंड व्यावसायिकांवर काही प्रमाणात परिणाम पाण्याच्या बाटल्या, इलेक्ट्रॉनिक फ्रीजने झाला आहे. परंतु आजही थंड पाण्यासाठी सर्वत्र मातीचा माठ वापरला जात आहे. शहरी भागापेक्षा ग्रामीण भागात याचा वापर अधिक वापर केला जात आहे. हळूहळू सगळ कितीही जग पुढे गेले तरी काही काही गोष्टी या ङ्गजुनं ते सोनंफ असं म्हणून आपण वापरतच असतो त्यातीलच एक गोष्ट म्हणजे माठ. आपल्या पूर्वजांनी मातीचं महत्त्व जाणलं होतं म्हणूनच त्यांनी माठाची निर्मिती केली होती. अजूनही अनेक कुटुंबात माठाचा वापर केला जातो.

सध्या उन्हाचा पारा वाढल्याने माठांची मोठ्या प्रमाणावर विक्री होत असून, नागरिकांतून चांगली मागणी वाढली आहे. पंधरा लिटर पाण्याची साठवण क्षमता असलेल्या माठाची किंमत १०० ते २०० रुपयांपर्यंत असलेल्या माठांची विक्री होत असून नळ असलेल्या माठांची किमत थोडी जास्त असल्याचे दिसून येत आहे.

**मातीच्या भांड्यांचा वापर वाढला**

आरो वॉटर मशीन, मिनरल वॉटर, पाण्याचे पाऊच, पाण्याचे जार, थंड पाण्याच्या बाटल्या, इलेक्ट्रॉनिक फ्रीज या नवीन तंत्रालाही ( मातीचे भांडेना टक्कर देत आहेत. पाण्याची बाटली, माठ, पातेले, तवा, गाडगे, ताट, वाटी अशी मातीपासून बनवलेली भांडी बाजारात विक्रीसाठी आले आहेत.

# शेत रस्त्याची कामे दर्जेदार गुणवत्तापूर्ण झाले पाहिजेत: आ. अमित देशमुख

## बाभळगाव परिसरातील शेतरस्त्याच्या कामाचे भूमिपूजन



लातूर / प्रतिनिधी– बाभळगाव ग्रामपंचायतच्या हद्दीमध्ये १३ किलोमीटर शेतरस्ते करण्यात येणार आहेत. या शेतरस्त्यामुळे प्रत्येकाला शेताकडे जाण्यासाठी बारमाही रस्ता उपलब्ध होईल, या रस्त्याचे काम दर्जेदार गुणवत्तापूर्ण झाले पाहिजे असे राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी म्हटले आहे.

बाभळगाव परिसरातील एकूण १३ किलोमीटर शेत रस्त्यांच्या कामाला मंजुरी मिळाली आहे, गुरुवार दि. १४ मार्च रोजी बाभळगाव परिसरातील शारदा पांडुरंग बदामे ते युवराज थडकर यांच्या शेतापर्यंतच्या शेतरस्त्यांच्या कामांचे भूमिपूजन त्यांच्या हस्ते करण्यात आले, या प्रसंगी ते बोलत होते.यावेळी लातूर ग्रामीणचे आमदार धीरज विलासराव देशमुख, तहसीलदार सौदागर तांदळे, सरपंच प्रिया सचिन मस्के, उपसरपंच गोविंद देशमुख, मनरेगाचे अभियंता सुनील श्रणगारे, लातूर पंचायत समितीचे अधिकारी मुक्तापुरे, ग्रामसेवक अनंत मडके, तलाठी गोविंद तावरे, रामदास पवार, सचिन मस्के, पोलीस पाटील मुक्ताराम पिटले आदीसह काँग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी बाभळगाव ग्रामस्थ उपस्थित होते.

माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यावेळी म्हणाले की, बाभळगाव ग्रामपंचायतच्या हद्दीमध्ये १३ किलोमीटर शेतरस्ते सर्वांच्या विनंतीने करण्यात येणार आहेत. लातूरचे तहसीलदार व त्यांच्या टीमची हे रस्ते मोकळे करण्यात महत्त्वाची भूमिका असणार आहे. या रस्त्यामध्ये कुठलाही वाद नसावा अशी अपेक्षा मी बाळगतो असे सांगून प्रत्येकाला शेताकडे जाण्यासाठी बारमाही रस्ता उपलब्ध होईल, या रस्त्याचे काम दर्जेदार गुणवत्तापूर्ण झाले पाहिजे असे त्यांनी सांगितले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन युवराज थडकर यांनी केले तर शेवटी आभार बाभळगावचे उपसरपंच गोविंद देशमुख यांनी मानले.

# जि.प.प्रशालेत नवीन आलेल्या शिक्षीका जावरे निषा यांचा सत्कार



शिरूरआनंतपाळ : राज्य शासनाच्या शिक्षण विभागाकडुन पवित्र पोर्टलवर शिक्षकाची यादी तयार करण्यात आली असुन शिरूरआनंतपाळ तालूक्यात दोन नवीन प्राथमीक पदवीधर शिक्षकांची नियुक्ती झाली असुन येरोळ येथील जि.प.प्रशालेमध्ये सहशिक्षीका म्हणुन जावरे निषा या आल्या असुन त्यांचा शालेय व्यवस्थापण समीती व ग्रा.प,च्या वतीने शालश्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

येरोळ जि.प.प्रशालेत ३८० विद्यार्थी असुन अनेक शिक्षकांच्या जागा रिक्त आहेत. शालेय व्यवस्थापण समीती व ग्रा.प,ने जि.प. लातुर यांच्याकडे वेळोवेळी शिक्षक देण्याची मागणी केली होती. शिक्षण विभागाने लातुर जिल्ह्यात ५१ शिक्षकांना नियुक्तीपत्र दिले असुन शिरूरआनंतपाळ तालुक्यात दोन शिक्षकांना नियुक्ती मिळाली असुन येरोळ जि.प.प्रशालेला प्राथमीक पदवीधर महिला शिक्षीका म्हणुन जावरे ( चोंचडे ) निषा यांची नियुक्ती झालेली असुन मंगळवारी त्या या शाळेत रुजु झाल्याबदल शालेय व्यवस्थापण समीती व ग्रा.प,चे उपसरपंच सतिस सिंदाळकर मु.अ.राज निचळे यांच्या हस्ते त्यांचा शालश्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी शालेय व्यवस्थापण समीतीचे अध्यक्ष गुंडेराव चौसष्टे, भिवाजी लोकरे, हाबीब पठाण, प्रा,प्रभाकर चोंचडे, जेष्ट पत्रकार ओमप्रकाश तांबोळकर, आमर माडजे पाटील, हानमंत भुसारे, शिवानंद भुसारे , योगेश पालकर, बब्बण साकोळकर, धोंडीराम कोकरे, मैनोद्दीन मुजेवार, भागवत नाळापुरे, आशोक चोंचडे यांच्यासह शाळेतील सह शिक्षक व गावातील शिक्षणप्रेमी नागरिक उपस्थित होते.

# मानव विकास मिशन अंतर्गत सायकलींचे वाटप

## सावित्रीबाई फुले मुलींची शाळा हणेगावं येथे ४७ सायकलींचे वाटप




देगलूर (प्रतिनीधी): तालुक्यातील हानेगावं येथील सावित्रीबाई फुले मुलींची माध्यमिक शाळा येथे आज मानव विकास मिशन अंतर्गत एकूण ४७ मुलींना सायकलींचे वाटप करण्यात आले.

शाळेच्या मुख्याध्यापिका सुरेखा राणे, शरण शांतीवर्धक शिक्षण संस्था कार्यकारणी सचिव बसवराज पटणे यांच्या हस्ते सदरील सायकलींचे वाटप करण्यात आले . याप्रसंगी शाळेतील शिक्षक प्रभुलिंग माळगे, लक्ष्मण बडगे , प्रशांत शेटकार ,श्रीमती मालशेठवार ,सुनीता घोंगडे , संजय घाळे सर, यरनाळे आदी उपस्थित होते. नवीन सायकल मिळाल्याचा आनंद विद्यार्थ्यांमध्ये दिसून येत होता.

मानव्य विकास विद्यालय देगलूर येथे ४० सायकलींचे वाटपदेगलूर (प्रतिनीधी): येथील मानव्य विकास विद्यालयात मानव विकास मिशन अंतर्गत एकूण ३० मुलींना सायकलींचे वाटप करण्यात आले. शाळेचे मुख्याध्यापक संतोष कोल्हे,पर्यवेक्षक शरद हांद्रे यांच्या हस्ते सायकलींचे वाटप करण्यात आले.यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष श्याम कोल्हे,शिक्षक प्रतिनीधी संजय कल्याणी,सह अन्य शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# महाविद्यालयीन जीवनातील वेळेचा सदुपयोग विद्यार्थ्यांच्या भविष्याचा मार्ग सुखकर करेल – महेश येलगट्टे



लातूर – येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयातील जैवतंत्रज्ञान विभागातर्फे विद्यार्थी – पालक मेळावा आयोजित केला होता. त्याच निमित्ताने एमपीएससी व यूपीएससी मार्गदर्शन व्याख्यान आयोजित करण्यात आले.विद्यार्थी पालक सवांद कसा असावा तसेच योग्य नियोजन करून विद्यार्थ्यांनी वेळेचा सदुपयोग केला तर त्यांना यश नक्की लवकर मिळेल असे मत महेश येलगट्टे यांनी मांडले. स्पर्धा परीक्षेला सामोरे जाण्याची पूर्वतयारी आतापासूनच केली तर तुमचा पाया भक्कम होईल व स्पर्धेला तोंड देत असताना भीती वाटणार नाही,असेही ते म्हणाले. जर अपयश आलेच तर त्यासाठी प्लॅन बी विद्यार्थ्यांनी तयार ठेवावा असाही सल्ला त्यांनी यावेळी दिला.

दयानंद विज्ञान महाविद्यालयात दि.१४ मार्च २०२४ रोजी जैवतंत्रज्ञान विभागाच्या वतीने वैज्ञानिक अल्बर्ट आईन्स्टाईन यांची १४५ वी जयंती साजरी करण्यात आली.वैज्ञानिकांच्या जन्मदिनानिमित्त त्यांच्या कार्यास अभिवादन करण्याचा हा उपक्रम जैवतंत्रज्ञान विभागातर्फे राबवला जातो.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जयप्रकाश दरगड,उपप्राचार्य डॉ. सिद्धेश्वर बेल्लाळे,एमपीएससी २०२२ मध्ये यश संपादन राज्यात केलेले महेश येलगट्टे ज्यांनी आपले शिक्षण आयसर भोपाळ येथून केले.दयानंद विज्ञान महाविद्यालयाची माजी विद्यार्थीनी ऐश्वर्या अंधारे,पालक प्रतिनिधी श्रीमती अंबर व जैवतंत्रज्ञान विभाग प्रमुख डॉ.कोमल गोमारे यांनी कार्यक्रमाची सुरुवात विद्येची देवता माता सरस्वती व आइन्स्टाईन या वैज्ञानिकाच्या प्रतिमेस वंदन करून केली. वैज्ञानिक अल्बर्ट आईनस्टाईन यांची विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रातील कारकीर्द बी.एस्सी.बी.टी.प्रथम वर्षाची विद्यार्थीनी पर्णवी ढवारे यांनी सांगितली.

अल्बर्ट आइनस्टाईन हे जर्मन–जन्मलेले सैद्धांतिक भौतिकशास्त्रज्ञ होते,ज्यांना सर्व काळातील महान आणि सर्वात प्रभावशाली शास्त्रज्ञ मानले जाते. सापेक्षतेचा सिद्धांत विकसित करण्यासाठी प्रसिद्ध असलेल्या आइन्स्टाईनने क्वांटम मेकॅनिक्समध्ये देखील महत्त्वपूर्ण योगदान दिले आणि अशा प्रकारे विसाव्या शतकाच्या पहिल्या दशकात आधुनिक भौतिकशास्त्राने निसर्गाच्या वैज्ञानिक समाजाच्या क्रांतिकारक पुनर्रचनामध्ये ते एक केंद्रीय व्यक्तिमत्त्व होते.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जयप्रकाश दरगड अध्यक्षीय समारोप प्रसंगी बोलताना विभागांतर्गत उपक्रमांचे कौतुक करत विद्यार्थ्यांचा सहभागातून होणारे कार्यक्रमाचे नियोजन उत्तम असून पालकांचाही त्यामधील सहभाग मुलांच्या आयुष्यात नक्कीच प्रगती आणणारा ठरेल असे मत व्यक्त केले. या कार्यक्रमासाठी विद्यार्थ्यांच्या जैवतंत्रज्ञान विद्यार्थी मंचचे पदाधिकारी तसेच विभागातील पदवी व पदव्युत्तर वर्गाचे विद्यार्थी व त्यांचे पालक बहुसंख्येने उपस्थित होते.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जैवतंत्रज्ञान विभागातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचेही बहुमोल सहकार्य मिळाले.

# अर्थसंकल्पीय निधी दिल्याबद्दल शिंदे, फडणवीस, पवार सरकारचे आभार



चाकूर : पंढरपूर येथील श्री.विठ्ठल रुक्मिणी देवस्थानास समिती स्थापन झाल्यापासून म्हणजे १९८५ सालापासून आजपर्यंत आर्थसंकल्पनेद्वारे निधी मिळाला नाही. पण या सरकारने यावेळेस २६ कोटी रुपयांचा अर्थसंकल्पीय निधी दिला आहे. त्याबद्दल मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे जाहीर आभार विठ्ठल रुक्मिणी देवस्थानचे सह अध्यक्ष ह.भ.प.गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी लातूर जिल्ह्यातील चाकूर येथे नगरपंचायतीच्या २५ कोटी रुपयांच्या भूमिपूजन व लोकार्पण सोहळ्या प्रसंगी अध्यक्षीय भाषणात व्यक्त केले.

नगरपंचायत अंतर्गत विकास कामासाठी माजी मंत्री आमदार बच्चूभाऊ कडू व आमदार बाबासाहेब पाटील यांच्या विशेष प्रयत्नातून चाकूर शहरासाठी विविध योजनेच्या माध्यमातून मंजूर करण्यात आलेल्या २५ कोटी रुपये कामांचे भूमिपूजन व लोकार्पण सोहळ्याचा मुख्य कार्यक्रम मस्जिद चौक चाकूर येथे पार पडला . या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री ह.भ.प. गहिनीनाथ महाराज औसेकर (सह अध्यक्ष विठ्ठल रुक्मिणी देवस्थान समिती पंढरपूर), कार्यक्रमाचे उद्घाघाटक आमदार बाबासाहेब पाटील, स्वागताध्यक्ष कपिल माकणे, शिवसेना जिल्हा प्रमुख लातूर गोपाळ माने, प्रहार जिल्हाध्यक्ष राजाभाऊ चौगुले, चेअरमन गोविंदरावजी माकणे, उपनगराध्यक्ष अरविंद बिराजदार यांच्यासह नगरसेवक, नगरसेविका, यांच्यासह महायुतीचे कार्यकर्ते, आजी माजी पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, व्यापारी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी महायुती व वारकऱ्यांच्या वतीने ह.भ.प.गहिनीनाथ महाराज औसेकर यांचा नागरी सत्कार करण्यात आला.

# श्री महादेव विद्यालयात जागतिक महिला दिनानिमित्त युवक युवती मार्गदर्शन मेळावा



वलांडी –देवणी तालुक्यातील धनेगाव येथील श्री महादेव माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयात जागतिक महिला दिनानिमित्त युवक युवती मार्गदर्शन मेळावा मोठ्या उत्साहात संपन्न.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्राचार्य रामलिंगमुळे हे उपस्थित होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून कॉंग्रेस डॉक्टर सेलचे जिल्हाध्यक्ष डॉ. अरविंद भातांब्रे, देवणी येथील पोलीस निरीक्षक माणिकराव डोके, वरून सूर्यवंशी, प्रणव बिरादार आदी मान्यवर उपस्थित होते. प्रमुख अतिथींनी जागतिक महिला दिनानिमित्त युवक युतींना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मोमले एम.पी. यांनी केले तर आभार प्राचार्य रामलिंग मुळे यांनी मानले. या कार्यक्रमाला सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शेतकऱ्यांच्या विजेचा भार राज्य सरकार उचलणार

मुंबई : या आठवड्यात झालेल्या सलग दुस–या मंत्रिमंडळ बैठकीत २६ निर्णय घेण्यात आले. राज्यातील शेतक–यांना माफक दरात व त्यांच्या सोयीच्या कालावधीत वीज पुरवठा व्हावा, यासाठी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना सुरू करण्यात आली. या योजनेच्या अडचणी विचारात घेऊन शेतक–यांना दिवसा वीजपुरवठा व्हावा यासाठी नव्याने काही निर्णय घेण्यात आले आहेत.

दिवसा वीज देण्यासाठी आशियायी विकास बँकेकडून ११ हजार ५८५ कोटी तसेच कृषी वाहिन्यांच्या सौर उर्जीकरणासाठी आशियायी पायाभूत गुंतवणूक बँकेकडून ९,०२० कोटी रुपयांचे कर्ज घेण्यास आज मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास विभागाची पुनर्रचना करण्यात येईल. या निर्णयानंतर हा विभाग पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विभाग या नावाने ओळखला जाणार आहे. या विभागाच्या नियंत्रणाखाली व पर्यवेक्षणाखाली विभागाची क्षेत्रीय यंत्रणा कार्यरत राहील. त्याप्रमाणे राज्यातील ३५१ तालुक्यांमध्ये तालुका पशुसंवर्धन अधिकारी कार्यालय सुरू करण्यात येणार आहे.

महानंद एनडीडीबी कडे महानंद या सहकारी दूध क्षेत्रातील शिखर संस्थेच्या बळकटीकरणासाठी संस्थेचे व्यवस्थापन पुढील पाच वर्षांसाठी राष्ट्रीय दुग्ध विकास मंडळाकडे सोपविण्यात येईल. त्याचप्रमाणे गावपातळीवर एक गाव, एक दूधसंस्था ठेवण्यात येणार आहे. महानंदच्या पुनर्वसन योजनेसाठी शासन व राष्ट्रीय दुग्ध विकास मंडळ (एनडीडीबी) यांच्यामध्ये आवश्यक तो करारनामा करण्यात येणार आहे.




**जुक्टा संघटनेतर्फे मा. श्री. मापारी साहेब (माध्यमिक शिक्षणाधिकारी लातूर) यांचे अभिष्टचिंतन लातूर जिल्हा माध्यमिक शिक्षणाधिकारी मा.श्री. मापारी साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त शाल व बुके देऊन त्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. यावेळी लातूर जिल्हा जुक्टा संघटनेचे अध्यक्ष प्रा शिवराम सूर्यवंशी, कार्याध्यक्ष प्रा.संजय भंडारे, उपाध्यक्ष प्रा रामलिंग बिडवे, कार्यालयीन सचिव प्रा. राजेंद्र नागरगोजे, रेणापूर तालुका सचिव प्रा. लहुकांत शेवाळे, औसा तालुका उपाध्यक्ष प्रा. राजकुमार हालकुडे, औसा तालुका जिल्हा प्रतिनिधी प्रा. गजानन तनशेट्टी, निलंगा तालुका जिल्हा प्रतिनिधी प्रा सुर्यकांत माळी आदी पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.**

## राष्ट्रवादी काँग्रेस पदाधिकाऱ्यांच्या निवडीबद्दल सत्कार



धाराशिव दि.१४ (प्रतिनिधी) - राष्ट्रवादी काँग्रेसच्या नूतन पदाधिकाऱ्यांच्या निवडी झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. राष्ट्रवादी काँग्रेसच्या धाराशिव तालुक्यातील चिलवडी जिल्हा परिषद गट प्रमुख पदी संगीता ढोकळे, महिला अल्पसंख्यांक धाराशिव शहर कार्याध्यक्षपदी अमिना शेख यांची नियुक्ती जिल्हाध्यक्ष महेंद्र धुरगुडे यांच्या हस्ते करण्यात आली. यावेळी कार्याध्यक्ष समियोद्दीन मशायक, धाराशिव तालुकाध्यक्ष प्रशांत फंड, महिला जिल्हा कार्याध्यक्ष अप्सरा पठाण, माजी सैनिक विभाग जिल्हाध्यक्ष मच्छिंद्र क्षीरसागर, अल्पसंख्यांक शहराध्यक्ष अरफात काझी, अंबेजवळगा जि प गट प्रमुख सुरेश राठोड, केशेगाव जि.प. गट प्रमुख लिंबराज लोखंडे, सामाजिक न्याय जिल्हा सरचिटणीस राजाभाऊ जानराव, महिला तालुका उपाध्यक्ष उषा लगाडे, लता ढोकळे, उषा सोनवणे, संगीता सरवदे, वैशाली साबळे, सुलभा धर्मे, मनीषा संकपाळ, शोभा सोनवणे आदी उपस्थित होते.

# प्रहारच्या मोफत दिव्यांग रेल्वे पास नोंदणी शिबिरामध्ये १२०० जणांची नोंदणी

धाराशिव दि.१४ (प्रतिनिधी) - प्रहार दिव्यांग क्रांती आंदोलन व शिवअर्पण दिव्यांग संघटना महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्तविद्यमानाने मोफत दिव्यांग रेल्वे पास नोंदणी शिबिर आयोजित करण्यात आले होते या शिबिराचे आयोजन शासकीय विश्रामगृह येथील सभागृहात आयोजित करण्यात आला होता यावेळी दिव्यांग संघटनेतर्फे धाराशिव तालुक्यातील दिव्यांग व्यक्तींना मोफत दिव्यांग रेल्वे पासकरिता नोंदणी करण्यात आली धाराशिव येथील शिव अर्पण दिव्यांग संघटना महाराष्ट्र राज्य व प्रहार दिव्यांग संघटना धाराशिव यांची दिव्यांग रेल्वे पास नोंदणीकरिता शासकीय विश्रामगृह येथे हजार ते बाराशे च्या आसपास दिव्यांग बांधव उपस्थित होते यावेळी प्रमुख पाहुणे म्हणुन व्हॉइस ऑफ मेडियाचे अध्यक्ष पांडुरंग मते व मल्लीकार्जुन सोनवणे होते तर अस्थिरोग तज्ञ डॉ विकास बाराते डॉक्टर अमोल खंडागळे डॉ महेश पाटील अस्थिव्यंगसहाय्यक अजित पवार यांनी मोलाचे सहकार्य केले तर कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून हे आयोजन प्रहार दिव्यांग संघटनेचे व प्रहार जनशक्ती पक्षाचे जिल्हाध्यक्ष मयूर काकडे, बाळासाहेब पाटील जमीर शेख बाळासाहेब कसबे बालाजी तांबे,नवनाथ कचार,संजय नायकवडी,दिनेश पोतदार, संदीप घोडके,प्रकाश खडके विठ्ठल चव्हाण शिवाजी पोद्दार,दत्ता पवार,बाबा भोईटे, सरताज पठाण,श्रीमंत गरड,मोहम्मदअत्तार,आदी पदाधिकारी उपस्थित होते,याकरिता धारशिव जिल्हाधिकारी,जिल्हा शल्यचिकित्सक व आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांनी मोलाचे सहकार्य केल्याचे दिव्यांग संघटनेचे जिल्हाध्यक्ष काकडे यांनी सांगितले.



## पान १ वरून

### वन नेशन...

एकाच वेळी घेण्याच्या शक्यता तपासण्याचे आणि शिफारशी करण्याचे काम सोपवण्यात आले आहे.

सरकारी अधिसूचनेत असे म्हटले आहे की, समिती ताबडतोब काम सुरू करेल आणि शक्य तितक्या लवकर शिफारशी करेल, परंतु अहवाल सादर करण्यासाठी कोणतीही कालमर्यादा निर्दिष्ट केली नाही. माजी राष्ट्रपती कोवदिं यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्याच्या निर्णयाने विरोधी पक्षाला आश्चर्याचा धक्का बसला होता आणि १ सप्टेंबर रोजी मुंबईत त्यांची परिषद आयोजित केली होती.

विरोधी पक्षांनी हा निर्णय देशाच्या संघीय रचनेसाठी धोका असल्याचे म्हटले होते. लोकसभेचे माजी महासचिव सुभाष सी. कश्यप, ज्येष्ठ वकील हरीश साळवे आणि माजी मुख्य दक्षता आयुक्त संजय कोठारी हे देखील समितीचे सदस्य आहेत. कायदा मंत्री अर्जुन राम मेघवाल विशेष निमंत्रित म्हणून समितीच्या बैठकीला उपस्थित होते, तर कायदा सचिव नितेन चंद्र हे समितीचे सचिव आहेत.

### जीएसटीमधून...

आमचे सरकार आल्यानंतर आयात-निर्यात धोरणापासून शेतकऱ्यांचे संरक्षण केले जाईल. शेवटचा आणि पाचवा उपाय म्हणजे जीएसटीमुळे शेतकऱ्यांवर विविध प्रकारचे कर लागत आहेत. त्यामुळे जीएसटीचा अभ्यास करून शेतकरी जीएसटीच्या बाहेर राहील, याचा प्रयत्न आम्ही करू, असे राहुल गांधी यांनी जाहीर केले.

### पेट्रोल...

नरेंद्र मोदी यांनी पुन्हा एकदा कोट्यवधी भारतीयांच्या कुटुंबाचे कल्याण आणि सुविधा हे त्यांचे नेहमीच ध्येय असते, हे पुन्हा एकदा सिद्ध केले आहे, असे आपल्या ट्विटर पोस्टमध्ये म्हटले.

त्यानुसार भारताची आर्थिक राजधानी, मुंबई, जिथे व्हॅट आणि इतर करांमुळे इंधन दिल्लीच्या तुलनेत अधिक महाग होते. तिथे किंमत २.१०/छ रुपयाने कमी केली आहे. मुंबईतील पेट्रोलची सध्याची किंमत रु. १०६.३१/ली आहे. आता हीकिंमत रु. १०४.२१/ली होईल. तसे मुंबईत डिझेलची प्रति लिटरकिंमत ९४.२७ रुपये आहे. उद्यापासून प्रभावी हीकिंमत ९२.१५ रुपये ली. होईल.

### घड्याळ...

किंवा अप्रत्यक्ष वापर करणार नाही, असे हमीपत्र दाखल करण्यास न्यायालयाने अजित पवार गटाला सांगितले. त्याचबरोबर अजित पवार गटाने निवडणुकीसाठी घड्याळ या चिन्हाशिवाय दुसरे चिन्ह वापरावे, जेणेकरून कोणताही गोंधळ होणार नाही, असेही न्यायालयाने तोंडी सुचवले आहे.

दरम्यान, सर्वोच्च न्यायालयाने शरद पवार यांचं नाव आणि चिन्ह वापरणार नाही असं लेखी देण्याचे निर्देश अजित पवार गटाला दिले आहेत. यावर शनिवारी आम्ही प्रतिज्ञापत्र सादर करू, असे अजित पवार गटाने स्पष्ट केले आहे. या प्रकरणाची पुढील सुनावणी सोमवार १८ मार्च रोजी होणार आहे.

### लोकसभा...

केरळचे आयएएस अधिकारी आहेत.यापूर्वी ते गृहमंत्रालयात होते. कलम ३७० संदर्भात निर्णय घेताना ते गृहमंत्रालयात होते.

आपल्याकडे दिली होती २१२ नावे

आपल्याकडे २१२ नावे एका दिवसांपूर्वी दिली होती. त्यामुळे रात्रभर मी विचार करत राहिलो. दुसऱ्या दिवशी सहा नावे माझ्याकडे दिली आहे. त्यानंतर आपण या प्रक्रियेबाबत असंतुष्ट असल्याचे अधीर रंजन चौधरी यांनी सांगितले. दरम्यान, ज्ञानेश कुमार आणि सुखबीर संधू यांची नावे समितीने निश्रि्चत केली आहे. आता ही नावे राष्ट्रपतीकडे जातील. त्यानंतर राष्ट्रपती या नावांवर अंतिम मोहोर उमटवतील.

फेब्रुवारीमध्ये अनुप पांडे यांच्या निवृत्तीनंतर आणि गोयल यांच्या राजीनाम्यानंतर, तीन सदस्यीय निवडणूक आयोगामध्ये आता फक्त मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार राहिले होते. गोयल, ज्यांचा कार्यकाळ डिसेंबर २०२७ पर्यंत होता, परंतु त्यांनी ९ मार्च रोजी राजीनामा दिला.

### आचारसंहिता...

मला लवकर मिळाली असती तर दिल्लीत पोहोचल्यावर मला उमेदवारांची माहिती मिळाली असती. पण ती संधी मला मिळू शकली नाही. मला २१२ नावांची यादी देण्यात आली होती. २१२ लोकांची माहिती तातडीने घेणे शक्य नव्हते. त्यात समितीतील बहुमत सरकारकडे आहे. त्यामुळे आयुक्तांची निवड ही सरकारची पसंती असणाऱ्या व्यक्तीचीच होणार हे उघड आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालील, निवड समितीमध्ये केंद्रीय मंत्री आणि लोकसभेतील काँग्रेसचे नेते अधीर रंजन चौधरी यांचा समावेश आहे. नियुक्ती अधिकृतपणे अधिसूचित झाल्यानंतर, त्यांना नवीन कायद्यानुसार प्रथम चिन्हांकित केले जाईल. हा कायदा तीन सदस्यीय निवड समितीला शोध समितीने शॉर्ट-लिस्ट न केलेल्या व्यक्तीची नियुक्ती करण्याचा अधिकार देतो.

### निलेश...

सव्याज परतफेड केली. अजितदादा गटाकडून आजपर्यंत खेळण्यात आलेल्या कायदेशीर डावपेचांना शरद पवार यांनी त्याच भाषेत उत्तर दिले.

अखेर निलेश लंके पवारांच्या राष्ट्रवादीत डेरेदाखल, मात्र वसंत मोरे प्रवेश न करताच माघारी, कारण काय?

नेमकं काय घडलं?

निलेश लंके हे आज शरद पवारांना भेटले असले तरी त्यांचा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षामध्ये अधिकृतरित्या पक्षप्रवेश झालेला नाही. लंके यांनी आज शरद पवार गटात प्रवेश केला असता तर अजित पवारांनी पक्षांतर बंदी कायद्याचा आधार घेत कारवाई त्यांच्यावर कारवाई केली असती. तसे झाले असते तर पुढील सहा वर्ष निवडणूक लढविण्यास अडचण येऊ शकते. हे ध्यानात घेऊन निलेश लंके यांच पक्षप्रवेश लांबणीवर टाकण्यात आला. आगामी काळात कदाचित आमदारकीचा राजीनामा देऊन ते अहमदनगर दक्षिण लोकसभा मतदारसंघातून अर्ज दाखल करतील. आजच्या पत्रकार परिषदेत निलेश लंके, जयंत पाटील आणि शरद पवार यापैकी कुणीही लंके राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश करतायत असे म्हणालेल नाही. फक्त त्यांच्या हातात तुतारी हे चिन्ह देण्यात आले होते. त्यामुळे शरद पवार यांनी आपला हेतूही साध्य केला आणि निलेश लंके यांनाही पक्षांतरबंदीच्या कारवाईपासून वाचवले. ही खेळी खेळून शरद पवार यांनी पुन्हा एकदा आपण आजही महाराष्ट्राच्या राजकारणातील चाणक्य असल्याचे दाखवून दिले आहे.

### कष्टकऱ्यांच्या...

बांधण्यासाठी ज्या व्यापाऱ्याने आपली दुकाने दिली त्यांना नवी दुकानात त्वरित उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने कारवाई करावी, बाजार समिती परिसरात, आणखी ज्या ठिकाणी आवश्यक आहे तेथे रस्ते, नाल्या बांधण्या संदर्भात तसेच कचरा व्यवस्थापन पाणीपुरवठ्याची सुविधा, सीसीटीव्ही पथदिवे यासंदर्भात येथील सर्व घटकांची विचार विनिमय करून निर्णय घ्यावेत, काळाची गरज ओळखून वेळ न दवडता नवीन बाजार समिती उभारणीच्या कामालाही आता सुरुवात करण्यात येणार आहे, कालबद्ध कार्यक्रमाखून बाजार टप्प्याटप्प्याने नव्या ठिकाणी स्थलांतरित करण्याची योजना राबवावी. बाजार समिती स्थलांतरित झाल्यानंतर या ठिकाणीही, लातूरची गरज लक्षात घेऊन, गंजगोलाईच्या धरतीवर अद्यावत, सुसज्ज व्यापार पेठ उभारण्याचे नियोजन करण्याच्या सूचनाही संचालक मंडळाला याप्रसंगी राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्य मंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख दिल्या आहेत.

माजी मंत्री तथा सहकारमहर्षी आदरणीय श्री. दिलीपराव देशमुख साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली आणि माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख साहेब यांच्या नेतृत्वाखाली आपल्या बाजार समितीची वाटचाल सक्षमपणे सुरू आहे. आपली बाजार समिती ही अनेक दशकांपासून शेतकऱ्यांच्या सेवेत कार्यरत आहे. शेतकरीहिताचे काम करीत बाजार समितीने राज्यात लौकिक प्राप्त केला आहे असे आमदार धिरज विलासराव देशमुख यावेळी बोलतांना म्हणाले. पूढे बोलतांना आमदार धिरज विलासराव देशमुख म्हणाले, लातूर बाजार समितीतील सोयाबीन, तुरीचे दर पाहून राज्यातील इतर बाजार समितीत शेतीमालाचे दर ठरतात, ही लातूरसाठी अभिमानाची व गौरवाची बाब आहे. म्हणूनच राज्यातील अग्रगण्य बाजार समितीपैकी ही एक बाजार समिती आहे. बाजार समितीचे हे कार्य, तिचा लौकिक अधिक उंचावण्यासाठी संचालक मंडळ कार्य करीत आहे. बाजार समितीने बदलत्या काळानुसार मुलभूत सुविधा निर्माण करण्यासाठी पुढाकार घ्यावा. येणाऱ्या काळात लातूर रेशीम कोशाचे हब झाले पाहिजे, यासाठी जाणिवपूर्वक प्रयत्न व्हावेत. निर्यातक्षम द्राक्ष, ड्रॅगन फ्रुट फळासाठी, भाजीपाला उत्पादक शेतकऱ्यांसाठी वेअर हाऊस, कोल्ड स्टोअरेज सुविधा तयार कराव्यात. देवणी गोवंशाला प्रोत्साहन द्यावे. प्रक्रिया उद्योग, जोडधंदे यातून शेतकरी सक्षम झाला पाहिजे यासाठी ग्रुप फार्मिंग, शेतकरी उत्पादक गटांना प्रोत्साहन द्यावे. त्यांना मार्गदर्शन करावे, अशी अपेक्षा व्यक्त केली.

लातूर बाजार समिती बरोबरच लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक शेतकरी हित केंद्रबिंदू मानून कार्यरत आहे. जिल्हा बँकेने केवळ ऊस उत्पादकच नव्हे हरभरा, सोयाबीन आदी पिकांसाठी शेतकऱ्यांना, अल्पभूधारक शेतकऱ्यांना १,८०० कोटी रुपयांचे बिनव्याजी कर्ज वाटप केले. तसेच, ४०३ उच्च शिक्षणाच्या मंजूर प्रस्तावासाठी १५ कोटी रुपये, ट्रॅक्टर खरेदीच्या ३१० प्रस्तावासाठी २० कोटी रुपये, शेतकऱ्यांच्या मुला-मुलींच्या लग्नाच्या शुभमंगल योजनेच्या ३,८०० प्रस्तावासाठी २३ कोटी रुपये, रेशीम शेतीसाठी २ कोटी २६ लाख रुपये, दुग्ध व्यवसायासाठी ३ कोटी रुपये, कृषी पायाभूत सुविधेसाठी ३ कोटी रुपये कर्ज वाटप केले. तुषार व ठिबक सिंचनासाठी तसेच १०४ ऊसतोडणी यंत्रासाठी १२० कोटी रुपयांचे कर्जवाटप शेतकरी बांधवांना केले. यातून प्रत्यक्ष, अप्रत्यक्षपणे जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात रोजगारही निर्माण झाला, अशी माहिती यावेळी आमदार धिरज देशमुख यांनी दिली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक सभापती जगदीश बावणे यांनी करून लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कार्याची सविस्तर माहिती दिली या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कमलाकर अनंतवाड व अरविंद पाटील यांनी केले तर शेवटी आभार संचालक युवराज जाधव यांनी मानले.

### विद्वानांचा...

आत्मज्ञं अर्चयेत भूतिकाम: ज्यांना लौकिक अभ्युदयाची इच्छा आहे त्यांनी आत्मज्ञानी लोकांचा गौरव, सत्कार, पूजन केले पाहिजे. वीरशैव धर्मात जंगमाराधना करण्याची पद्धत आहे. यामध्ये ज्ञानी लोकांचा गौरव करण्यात येतो. ज्ञानी महात्मे शिवज्ञानाची अनुभूती घेऊन लोकांना प्रवचन, किर्तन पाठ याद्वारे सांगतात. ज्ञानी, संत, शिवाचार्य, महात्मे यांच्याकडून घेतलेल्या ज्ञानाचे ऋण आपण फेडू शकत नाही. म्हणून किमान त्यांचे गुणगौरव करणे हे भक्तांचे कर्तव्य आहे. भगवंताने दिलेली ज्ञानसंपत्ती ज्ञानी महात्मे अनुभवतात. लोकभाषेमध्ये त्याचा प्रसार करतात. जगाच्या कल्याणासाठी जे ज्ञानोपासना करतात त्यांचा गुणगौरव करण्याने भक्तांचा अभ्युदय होतो. हे तत्व समजावून सांगण्यासाठी काशीपीठामध्ये प्राचीन काळापासून विद्वानांचा गुणगौरव केला जातो.

## जाहीर समन्स

**दिवाणी न्यायालय क.स्तर, रेणापूर**
**श्री.आर.बी.हनवते यांचे न्यायालयात**
**दिवाणी न्यायाधीश क.स्तर व**
**न्यायदंडाधिकारी प्र.वर्ग, रेणापूर, लातूर**
**नियमित दिवाणी दावा /२८४/२०२२**

**भगवान पिता पुंडलिक भालेराव वि. शंकर पिता पुंडलिक भालेराव**

**पुढील तारीख३ ०३-०४-२०२४**

**वादप्रश्नांच्या निश्चितीसाठी समन्स**

(आज्ञावली ५ नियम १,५)

प्रति,
शंकर पिता पुंडलिक भालेराव
वसवाडी ता.जि. लातूर Latur, LATUR, MAHARASHTRA

ज्याअर्थी भगवान पिता पुंडलीक भालेराव, यांनी तुमच्याविरुद्ध बद्यल दावा दाखल केला आहे; म्हणून सदर दाव्याचा जबाब देण्यासाठी ०३-०४-२०२४ रोजी मध्यान्ह ११ वाजता या न्यायालयात जातीने किंवा ज्यास यथायोग्य सूचना दिलेल्या असून जो दाव्यासंबंधीच्या सर्व महत्वाच्या प्रश्नांची उत्तरे देऊ शकेल अशा किंवा अशा सर्व प्रश्नांची उत्तरे शकणारी व्यक्ती ज्यांच्याबरोबर असेल अशा वकिलामार्फत हजर होण्यासाठी तुम्हाजला याद्वारे बोलावण्यात येत आहे आणि उक्त दिवशी तुमच्या बचावाचे प्रतिवादपत्र दाखल करण्याचा आणि तुमचा बचाव किंवा बजावटीची हक्कमागणी किंवा प्रतिहक्कमागणी ज्यांच्यावर आधारलेली असेल असे तुमच्या कब्जात किंवा अखत्यारात असलेले सर्व दस्तऐवज हजर करण्याचा निर्देश तुम्हाला याद्वारे देण्यात येत आहे आणि तुमच्या बचावाच्या किंवा हक्कमागणीच्या पुष्ठ्यर्थ पुरावा म्हणून तुम्ही तुमच्या कब्जात किंवा अखत्यारात असलेल्या किंवा नसलेल्या अशा अन्य कोणत्याही दस्तऐवजांवर अवलंबून असाल त्याबाबतीत तुम्ही, प्रतिवादपत्रासोबत जोडावयाच्या यादीमध्ये अशा दस्तऐवजांची नोंद केली पाहिजे.

यापुर्वी नमूद केलेल्या दिवशी तुम्ही हजर न राहिल्यास, तुमच्या गैरहजेरीत दाव्याची सुनावणी होऊन निर्णय देण्यात येईल, याची दखल घ्यावी. आज ०२.०३.२०२४ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाता शिक्कयानिशी दिले.

## जाहीरनामा

**तहसील कार्यालय जळकोट (शाखा दंडणीय)**
**जा.क्र.२०२४/एमएजी/कावि**
**दि.०४/०३/२०२४**
**जन्म मृत्यु जाहिर प्रगटन**

ज्याअर्थी अर्जदार गवळे स्नेहा कोंडीबा वय २२ वर्ष रा. पाटोदा बु ता. जळकोट जि. लातुर यांचा जन्म मौजे पाटोदा बु ता.जळकोट जि. लातुर येथे अर्जदार यांचे स्वगृही दिनांक ०२/०८/२००२ रोजी झाला असुन जन्म-मृत्यु नोंदवहीला त्याच्या जन्माची नोंद करण्यात आलेली नाही. सदरील अर्जदार गवळे स्नेहा कोंडीबा यांचा जन्म दिनांक ०२/०८/२००२ रोजीची नोंद जन्म-मृत्यु नोंदवहीला घेणेबाबत संबधितास आदेशीत करणे बाबत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. त्याअर्थी अर्जदार गवळे स्नेहा कोंडीबा यांचा जन्म दिनांक ०२/०८/२००२ रोजी झालेबाबत कोणास आक्षेप असेल तर हया जाहीरनाम्याच्या तारखेपासुन एक महिण्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवुन आपले म्हणने दाखल करावे. सदरील मुदतीत कोणी म्हणणे दाखल केले नाही तर न्यायालय सदरहु अर्जदार गवळे स्नेहा कोंडीबा यांचा जन्म दिनांक-०२/०८/२००२ रोजीची नोंद ग्रामपंचायत कार्यालय पाटोदा बु ता.जळकोट जि. लातुर येथे जन्म-मृत्यु नोंदवहीला घेणेबाबत संबंधितास आदेशीत करण्यात येईल.
आज दिनांक ०४/०३/२०२४ रोजी दिले
पुढे नेमलेली तारीख ०४/०४/२०२४

**तालुका दंडाधिकारी**
**तथा तहसीलदार जळकोट**

## जाहीरनामा

**तहसील कार्यालय जळकोट (शाखा दंडणीय)**
**जा.क्र.२०२४/एमएजी/कावि**
**दि.०४/०३/२०२४**
जन्म मृत्यु जाहिर प्रगटन

ज्याअर्थी अर्जदार गवळे संध्या कोंडीबा वय २२ वर्ष रा. पाटोदा बु ता.जळकोट जि. लातुर यांचा जन्म मौजे पाटोदा बु ता.जळकोट जि. लातुर येथे अर्जदार यांचे स्वगृही दिनांक ०२/०८/२००२ रोजी झाला असुन जन्म-मृत्यु नोंदवहीला त्याच्या जन्माची नोंद करण्यात आलेली नाही. सदरील अर्जदार गवळे संध्या कोंडीबा यांचा जन्म दिनांक ०२/०८/२००२ रोजीची नोंद जन्म-मृत्यु नोंदवहीला घेणेबाबत संबधितास आदेशीत करणे बाबत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.
त्याअर्थी अर्जदार गवळे संध्या कोंडीबा यांचा जन्म दिनांक ०२/०८/२००२ रोजी झालेबाबत कोणास आक्षेप असेल तर हया जाहीरनाम्याच्या तारखेपासुन एक महिण्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवुन आपले म्हणने दाखल करावे. सदरील मुदतीत कोणी म्हणणे दाखल केले नाही तर न्यायालय सदरहु अर्जदार गवळे संध्या कोंडीबा यांचा जन्म दिनांक-०२/०८/२००२ रोजीची नोंद ग्रामपंचायत कार्यालय पाटोदा बु ता.जळकोट जि. लातुर येथे जन्म-मृत्यु नोंदवहीला घेणेबाबत संबंधितास आदेशीत करण्यात येईल. आज दिनांक ०४/०३/२०२४ रोजी दिले
पुढे नेमलेली तारीख ०४/०४/२०२४

**तालुका दंडाधिकारी**
**तथा तहसीलदार जळकोट**

# जैव विविधता या विषयावर डॉ.देवकर यांचे व्याख्यान



धाराशिव दि.१४ (प्रतिनिधी) - येथील व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालयामध्ये ग्रीन क्लबच्यावतीने प्राणीशास्त्र विभागातील प्रा. डॉ. अनिल देवकर यांचे जैव विविधता संरक्षण या विषयावर व्याख्यान पार पडले. यावेळी ग्रीन क्लब विभागाचे समन्वयक व जिल्हा समन्वयक प्रा. डॉ. विनोदकुमार वायचळ, प्रा.अभय शिंदे, प्रा.अमोल हिंगमिरे आदी उपस्थित होते. यावेळी डॉ.देवकर यांनी जैव विविधतेचे महत्व सांगितले. तसेच सध्याच्या काळात अनेक प्राणी व वनस्पती नामशेष होत चालले आहेत. त्यांचे जतन व संवर्धन करणे हिऐ काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. वायचळ यांनी तर सूत्रसंचालन प्रा. अमोल हिंगमिरे यांनी व आभार प्रा. अभय शिंदे यांनी मानले. ग्रीन क्लब युवा अध्यक्ष स्वप्नील चांदणे, उपाध्यक्ष नेहा कांबळे, अभियान समन्वयक साक्षी झरकर, दस्तावेजीकरण समन्वयक सदिच्छा जगताप यांच्यासह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


**सुर्य कल्याण मुंबई रात्र** — स्पेशल ४५/७८

| ५ | ८ | ९ |
|---|---|---|
| १४० | ३७८ | ४५० |
| ५२-५७ | ८०-८५ | ९१-९६ |

**प्रो. दिपक कुमार**

स्पेशल चान्ससाठी मेंबरशिप नोंदणी चालू आहे. संपर्क साधावा.
१००% चान्स पास होणार

**गोल्डन विकली चान्सेस**

मिलन (उदय/अस्त)(शनिवार)

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २ | ३९० | ६ | २४० | ० | १४५ |
| | ४८० | | २६८ | | २३५ |
| | २२८ | | ३३० | | ५५० |
| | ९२-२१ | ३६-६७ | | ८०-०४ | |

कल्याण(उदय/अस्त)

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३ | १३९ | १ | १४६ | ८ | १२५ |
| | २३८ | | ४७० | | २६० |
| | ६७० | | १०० | | ४४० |
| | ९३-३२ | ०१-१४ | | ७८-८६ | |

ता.२५ व २९ चे जबरदस्त चान्ससाठी
संपर्क करा
सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष शास्त्रावर आधारी आहे. कृपया दुरुपयोग करु नये.
मोबा-९९७५४७९८२६

**नशिबाची परिक्षा** — गोल्डन विक्री चान्सेस

मिलनम डे

कल्याणम

| उदय-अस्त | | सिंगल:९-५-७ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| 130 | ७-४ | 124 | जोड | 40-67-91-82-75 |
| 248 | | 467 | | |
| 220 | | 700 | | |

कल्याणम

| उदय-अस्त | | सिंगल:०-३-७ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| 127 | ४-० | 158 | जोड | 06-24-39-57-48 |
| 280 | | 680 | | |
| 460 | | 455 | | |

मुंबैम (मेन)

| उदय-अस्त | | सिंगल:७-१-४ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| १७९ | ०-७ | १४५ | जोड | 72-30-18-45-09 |
| २९८ | | २३५ | | |
| ३७७ | | ५५० | | |

दिवाळी बंपर चालू आहे — 99 75 47 98 26

# यशवंत धाराशिव जिल्हा

शुक्रवार दि. १५ मार्च २०२४




कार्यालय/फॅक्स : ०२४७२-२२८९१२, E-mail malikarjun.sonawane@gmail.com

## परंडा येथे माजी सैनिक संघटनेच्या कार्यालयाचे उद्घाटन



धाराशिव दि.१४ (प्रतिनिधी) – माजी सैनिक संघटनेच्या कार्यालयाचे उद्घाटन पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक ईज पवार व उद्योजक रामभाऊ पवार यांच्या हस्ते रिबिन कापून करण्यात आले.

परंडा येथील पवार कॉम्प्लेक्समध्ये कार्यालयाच्या उद्घाटन प्रसंगी सैनिक कल्याण अधिकारी पळसे, सुभेदार मेजर कटारीया व माजी सैनिक संघटनेचे तालुकाध्यक्ष भाऊसाहेब मांडवे, उपाध्यक्ष विकास चौधरी, सचिव महावीर तनपुरे, मधुकर बिडवे, पत्रकार सुरेश घाडगे, प्रमोद वेदपाठक, प्रकाश काशिद, माजी सैनिक मेजर समाधान देवकर, हरी यादव, अभिमान यादव, नितीन नवले, शेळके, मिस्कीन, रामगुडे, गायकवाड, बारस्कर, भांगे, कांबळे, मिसाळ, शिंदे, धनवे मेजर, भोसले मेजर, घोगरे, सुर्यवंशी, जगताप, साबळे आदी उपस्थित होते. यावेळी ईज पवार म्हणाले की, सैनिक हे डिसीप्लीन ठेवून जबाबदारीने जनतेशी वागतात. तर ते देश सेवा करून परत आल्यावर खूप साऱ्या समस्या असतात. त्यांना आपली सहकार्याची भूमिका सतत राहील असे आश्वासन त्यांनी दिले. यावेळी रामभाऊ पवार यांनी आपले मनोगत व्यक्त केले. प्रस्तावित मेजर तनपुरे यांनी तर आभार तालुकाध्यक्ष भाऊसाहेब मांडवे यांनी मानले.

# पिण्याच्या पाण्याची टंचाई भासू देऊ नका – आ. पाटील



धाराशिव दि.१४ (प्रतिनिधी) – पिण्याच्या पाण्यासाठी कोणाचीही गैरसोय होणार नाही, याचे कटाक्षाने पालन करावे. यात दिरंगाई खपवून घेतली जाणार नसून नागरिकांना पायपीठ करायला लागू नये यासाठी विहिर, बोअर अधिगृहण करण्यात यावे. तसेच टँकरसह आवश्यक त्या उपाय योजना तातडीने राबविण्यात याव्यात अशा सूचना आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी धाराशिव व तुळजापूर येथील दुष्काळी परिस्थितीच्या अनुषंगाने घेतलेल्या आढावा बैठकीमध्ये उपविभागीय अधिकारी, तहसिलदार व गट विकास अधिकाऱ्यांना दि.१४ मार्च रोजी दिल्या.

दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर आ. पाटील यांनी तहसिलदार, गट विकास अधिकारी, सरपंच, तलाठी, ग्रामसेवक यांच्यासह तालुका स्तरावरील विभाग प्रमुखांची धाराशिव येथील जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन विभागाच्या सभागृहामध्ये तर तुळजापूर येथे पंचायत समितीच्या सभागृहामध्ये बैठक घेतली. तालुक्यातील सर्व गावाच्या सरपंच व ग्रामसेवक यांच्याकडून दुष्काळी परिस्थितीचा आढावा प्रश्नवलीच्या माध्यमातून भरून घेतला. त्यामुळे कुठल्या गावात किती विहीर, बोअरवेल ? यांचे अधिग्रहण करण्यात आले आहे. पाणी टंचाई किती आहे, टँकरची आवश्यकता आहे का ? रोजगार हमी योजनेची कामे, चाऱ्याची उपलब्धता याबाबतची सविस्तर माहिती घेण्यात आली. टंचाईच्या अनुषंगाने गरजेनुसार अधिग्रहन अथवा टँकर मागणी करण्यासंदर्भात सरपंचांनी ग्रामसेवकांना माहिती देणे, ग्रामसेवकांनी संबंधित गट विकास अधिकारी यांना माहिती तात्काळ देणे आणि ती माहिती तहसीलदार यांना कळवणे अशा बैठकीत सूचना देण्यात आल्या. यामध्ये दफ्तर दिरंगाई सहन केली जाणार नाही, पिण्याच्या पाण्यासाठी नागरिकांची भटकंती होणार नाही याची दक्षता घेण्याच्या सूचना अधिकाऱ्यांना देण्यात आल्या. गेल्या वर्षी ज्या शेतकऱ्यांच्या विहिरीचे, बोअरवेलचे आधिग्रहणाचे बिल मिळाले नाही. त्या बाबतीत देखील लवकरच मार्ग काढण्याबाबत उपस्थित सरपंचांना अवगत केले. तसेच पुढील काळात जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न भेडसावणार नाही, याची दक्षता घेण्याच्या सूचना दिल्या. बैठकीमध्ये जल जीवन मिशन योजने अंतर्गत सुरू असलेल्या कामांचा आढावा घेण्यात आला. गावातील मजुरांच्या हाताला काम मिळावे यासाठी रोजगार हमी योजने अंतर्गत कामे करण्याच्या सूचना दिल्या. दुष्काळाच्या झळा सर्वसामान्य गावकऱ्यांना बसणार नाहीत, दुष्काळी परिस्थिती असली तरी पिण्याचे पाणी, हाताला काम देण्यासाठी आपण कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी नितीन काळे, उपविभागीय अधिकारी संजयकुमार ढवळे, धाराशिव तहसिलदार डॉ मृणाल जाधव, पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता सरवदे, गट विकास अधिकारी कांबळे, माजी सभापती बालाजी गावडे, तर तुळजापूर येथील बैठकीस तहसिलदार अरविंद भोळंगे, मुख्याधिकारी लक्ष्मण कुंभार, नायब तहसिलदार संताष पाटील, पाणी पुरवठा विभागाचे उप अभियंता भोई, महिला बालविकास अधिकरी गोरे, पशु वैद्यकीय अधिकारी क्षीरसागर, संतोष बोबडे, दिपक आलुरे, विक्रमसिंह देशमुख, राजकुमार पाटील, वसंत वडगावे, विलास राठोड यांच्यासह धाराशिव व तुळजापूर तालुक्यातील सरपंच, तलाठी व ग्रामसेवक आदी उपस्थित होते.

## पोहनेर येथील अनेक युवकांचा शिवसेनेमध्ये प्रवेश



धाराशिव दि.१४ (प्रतिनिधी) – तालुक्यातील पोहनेर येथील अनेक युवकांनी शिवसेना (ठाकरे) मध्ये खासदार ओमराजे निंबाळकर यांच्या मार्गदर्शनाखाली आ कैलास पाटील यांच्या उपस्थितीत प्रवेश केला.

धाराशिव तालुक्यातील पोहनेर येथील प्रवेश केलेल्या युवकांचे स्वागत करुन शिवसेना पक्षाच्या माध्यमातून आपण ग्रामीण भागातील प्रश्न नक्कीच सोडवाल अशी अपेक्षा व्यक्त केली. तसेच पुढील राजकीय वाटचालीस आमदार पाटील यांनी शुभेच्छा दिल्या. यावेळी माजी उपसभापती शाम जाधव, तालुकाप्रमुख सतीशजी सोमाणी, माजी सरपंच अंकुश मोरे, विभागप्रमुख अमोल मुळे, उपसरपंच जयराम मोरे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी ग्राप सदस्य लहू धावारे, सचिन घोलकर, दयानंद सारफळे, अतुल धावारे, अंगद धावारे, विश्वनाथ धावारे, सागर वाघमारे, अप्पासाहेब धावारे, काकासाहेब धावारे, सुजित देशमुख, महादेव धावारे, परमेश्वर धावारे, धनंजय बनसोडे, पवन देशपांडे, राहुल पवार, विश्वनाथ धावारे, गणेश देशमुख, शिवाजी आडगळे, हर्षद धावारे, ज्ञानेश्वर धावारे, गणेश धावारे, प्रवीण हुलवणे, नाना धावारे, अभिजीत शिरसाट, संदीप हुलवणे, पप्पू धावारे, गौतम धावारे यांच्यासह इतरांनी प्रवेश केला.

## काँग्रेसने कृषी उत्पन्न बाजार समितीला ठोकले टाळे



धाराशिव दि.१४ (प्रतिनिधी) – जिल्ह्यातील मोठी कृषी उत्पन्न बाजार समिती असलेल्या धाराशिव कृषी बाजार समितीच्या आवारात अंतर्गत रस्ते, कायमस्वरुपी विद्युत पुरवठा, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था व इतर सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात या मागण्यांसाठी काँग्रेसच्यावतीने बाजार समितीस टाळे दि.१४ मार्च रोजी ठोकण्यात आले.

धाराशिव येथील कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये गेल्या अनेक वर्षापासून कुठल्याही प्रकारचा निधी आलेला नसून आजतागायत एकही विकास कामे त्या ठिकाणी झालेले नाहीत. या बाजार समितीमध्ये फळे व भाजीपाला मोठ्या प्रमाणात येतो. त्या आवारात रस्ता, नाली भाजीपाला लिलावाचे शेड, येणाऱ्या शेतकऱ्यांना शेतकरी सभागृह, स्वच्छतागृह उपलब्ध नसल्याने या सर्वांची मोठी तारांबळ होत आहे.

तसेच भुसार मालाचे अडत्यांच्यासमोर आवश्यक रस्ता, नाली स्वच्छतागृह उपलब्ध नसल्याने या सर्वांचे हाल होत आहेत हीच अवस्था जनावरांचा बाजार याठिकाणी आहे. त्यांना देखील कायमस्वरुपांचे शेड, जनावरे बांधण्याचे व्यवस्था, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, अंतर्गत रस्ता, नाली व निवारा याची नितांत गरज असून बाजार समितीने आजतागायत कुठलीही सुविधा त्या ठिकाणी पुरविलेली नाही. तसेच संपूर्ण बाजार समितीला संरक्षीत भिंत, आवक–जावक गेट व कायमस्वरुपी सुरक्षा रक्षक याची नितांत गरज असताना देखील सभापती व संचालक या कामाकसे दुर्लक्ष करीत आहेत याच प्रश्नाकडे लक्ष वेधण्यासाठी आज अखिल भारतीय काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी बाजार समिती कार्यालयाला टाळे ळे ठोकले. दरम्यान सभापती व काँग्रेसचे बाजार समिती संचालक उमेश राजे निंबाळकर यांच्यात बाचाबाचीचा प्रकार घडला बाजार समितीला आ राणाजगजितसिंह पाटील यांनी निधी आणला असून या निधीमुळेच हे आंदोलन केले जात असल्याचा आरोप सभापतींनी केला आहे तर उमेश राजे म्हणाले की आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी आजपर्यंत निधी का दिला नाही दिला असेल तर तो सांगावा निवेदन देऊन आठ महिने लोटले तरी देखील बांधल्या ना पाण्याची व्यवस्था केली. सभापती यांनी आंदोलन करण्यास मज्जाव केल्यामुळे संतप्त काँग्रेस कार्यकर्त्यांनी हे आंदोलन अधिक तीव्रतेने केल्याचे निंबाळकर यांनी सांगितले.

यावेळी काँग्रेसचे जिल्हा कार्याध्यक्ष खलील सय्यद, जिल्हा संघटक राजाभाऊ शेरखाने, बाजार समितीचे संचालक उमेश राजेनिंबाळकर, जिल्हा उपाध्यक्ष प्रशांत पाटील, डॉ स्मिता शहापुरकर, शहराध्यक्ष अग्निवेश शिंदे, सिद्धार्थ बनसोडे, धनंजय राऊत, अभिषेक बागल, संजय गजधने, बाबा मोमीन, प्रभाकर लोंढे, महादेव पेठे, कफील खलील सय्यद ,बडूरकर, सौरभ गायकवाड आदींसह सर्व भाजीपाला व्यापारी, भुसार मालाचे व्यापारी, जनावराचे व्यापारी, समितीमधील हमाल मोठ्या संख्येने उपस्तित होते.

## राष्ट्रवादीचे विविध मागण्यांसाठी जनआक्रोश आंदोलन

धाराशिव दि.१४ (प्रतिनिधी) – संपूर्ण धाराशिव जिल्हा दुष्काळ जाहीर करुन शेतकरी, शेतमजूर व सुशिक्षीत बेरोजगारांचे सर्व कर्ज माफ करावे यासह इतर विविध मागण्यांसाठी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्यावतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर केंद्र व राज्य सरकार विरोधात ऊर बडवून, तुतारी वाजवून शंखनाद करुन व प्रचंड घोषणाबाजी करीत रखरखत्या उन्हात जनआक्रोश आंदोलन दि.१३ मार्च रोजी करण्यात आले.

खरीप २०२३ मधील शेतकऱ्यांचे नगदी पीक सोयाबीन कमी पावसामुळे हातचे निघून गेले. २०२३ मधील रब्बी हंगामातील हरभरा पिकाला एकरी एक क्विंटल उतार मिळाला, शेतीला पाणी नाही, विहीरीनी तळ गाठला आहे. शेतकरी, शेतमजूर व सुशिक्षीत बेकार युवक भयग्रस्त झालेला आहे. जिल्हाधिकाऱ्यांना जिल्ह्यातील अडीअडचणी विषयी वेळोवेळी लेखी निवेदन देवूनही आजतागायत त्यावर कोणतीही कार्यवाही झालेली नाही. त्या निषेधार्थ सामान्यांचा जनआक्रोष व्यक्त करण्यात आला. संपूर्ण जिल्हा तीव्र दुष्काळ जाहीर करुन दुष्काळी अनुदानाचे वाटप ताबडतोब करावे. शेतकरी, शेतमजूर व सुशेक्षति बेरोजगाराचे संपूर्ण कर्ज माफ करावे. गायीच्या दुधाला ४० तर म्हशीच्या दुधाला ७० रुपये प्रती लिटर प्रमाणे भाव देवून सरकारने घोषीत केलेले प्रती लिटर ५ रुपयांचे अनुदान त्वरीत वाटप करावे. सन २०२२ चा शिल्लक पीक विमा रक्कम त्वरीत वाटप करावी, सन २०२३–२०२४ मधील पीक विमा आग्रीम रक्कम सर्व शेतकजयांना त्वरीत वाटप करावी, सन २०२३ चा संपूर्ण पीक विमा मिळावा अन्यथा पीक विमा कंपनीला काळ्या यादीत समाविष्ट करावे. जिल्ह्यातील नगर परिषद व ग्रामीण क्षेत्राातील पाणी नियोजन, रस्ते व स्वच्छतेचा बोजवारा उडालेला आहे. त्यावर तात्काळ कारवाई करुन पाणी, रस्ता व स्वच्छतेचे नियोजन तात्काळ करण्यात यावे. टेंभूर्णी लातूर चौपदरीकरणाचे काम त्वरीत चालु करावे. मागील दोन वर्षापासून जिल्हा परिषद व पंचायत समितीला मिळणारे वित्त आयोगाचे १८० कोटी त्वरीत द्यावेत. शासनाकडून या मागण्याची दखल न घेतल्यामुळे जनआक्रोष व्यक्त करीत असल्याचे संजय पाटील दुधगावकर यांनी सांगितले.



यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्ह्याचे नेते संजय निंबाळकर, संजय पाटील दुधगावकर, भास्कर शिंदे, भालचंद्र बिराजदार, नरदेव कदम, सुरेश टेकाळे, मुसद्दीक काझी, रमेश देशमुख, नसीर शहाबर्फीवाले, श्रीहरी नाईकवाडी, बालाजी डोंगे, मुस्ताक हुसेनी, शिवाजी सावंत, विठ्ठल माने, मनोहर हारकर, अभिजित लोभे, शामसुंदर पाटील, अमर चोपदार, राजेंद्र लोमटे, औदुंबर धोंगडे, बाळासाहेब कथले, सागर चिंचकर, ॲड. प्रविण शिंदे, किशोर आवाड, ॲड. श्रीपाद तावरे, नारायण चोंदे, नानासाहेब जमदाडे, नवनाथ क्षिरसागर, भारत शिंदे, आनंत वरपे, ज्योतीताई माळाले, नामदेव चव्हाण, गणपत चव्हाण, रणवीर इंगळे, रमेश गादेकर, दौलत गाढवे, महेश पडवळ, रणजित वरपे, मिलींद नागवंशी, शैलेश चंदनशिव, ऋषिकेश कदम, पंकज भोसले, विलास जगताप, दिलीप लांडगे, भाउसाहेब शिंदे, यश सुराणा, बंडू शेळके, शिकंदर बेगडे, सतीश माळी, अक्षय कदम, रुबाब पठाण, शरद जगदाळे, किसन पांडगळे, बाळासाहेब रणसुरे, अहमद शेख, अब्बास बेगडे, गणेश खराडे, राजकुमार राठोड, राजेंद्र लोमटे, गाढवे सर, परमेश्वर येवले, बालाजी धोंगडे, आरिफ मुजावर, बालाजी शिंदे आदींसह पदाधिकारी, कार्यकर्ते व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## धाराशिव शहराच्या स्वच्छतेसाठी प्रभाग निहाय अधिकाऱ्यांवर जबाबदारी सोपवली

### मुख्याधिकारी वसुधा फड क्शन मोडमध्ये



धाराशिव दि.१४ (प्रतिनिधी) – शहरांमध्ये कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासह गटारींची साफसफाई काढण्याकडे दुर्लक्ष होत आहे. त्यामुळे नागरिकांना विविध अडचणींचा प्रचंड सामना करावा लागत आहे. तर अनेक नागरिक अस्वच्छतेबाबत नगर परिषदेकडे वारंवार मागणी, निवेदने व आंदोलने करीत आहेत. त्यामुळे शहरवासियांची अस्वच्छतेपासून मुक्तता व्हावी, यासाठी प्रत्येक प्रभाग निहाय व्यक्तींची नेमणूक केली असून त्यांच्यावर स्वच्छता करून घेण्याची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. विशेष म्हणजे अस्वच्छते बाबत त्यांच्याकडे नागरिकांना तक्रार करता यावी यासाठी त्यांचे संपर्क नंबर देखील देण्यात आलेले आहेत.

धाराशिव नगर परिषदेच्यावतीने स्वच्छता करण्यात यावी यासाठी जिल्हाधिकारी डॉ सचिन ओंबासे यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात नगर परिषदेचे मुख्याधिकारी व संबंधित अधिकारी यांची विशेष बैठक लावली होती. त्यावेळी नागरिकांनी शहरातील अस्वच्छतेविषयी जिल्हाधिकारी यांच्यासमोर पाढाच वाचला होता. जिल्हाधिकारींनी देखील नागरिकांची होणारी गैरसोय लक्षात घेऊन स्वच्छतेचे नियोजन लवकरच करण्याच्या सूचना मुख्याधिकारी वसुधा फड यांना दिल्या होत्या. त्यानुसार फड यांनी स्वच्छतेसाठी प्रभाव निहाय नियोजन केले आहे. प्रभाग न्याय व्यक्तींची नियुक्ती करून त्यांच्यावर जबाबदारी सोपविण्यात आली आहे. तसेच तक्रारीची सुविधा देखील उपलब्ध करुन देण्यात आली आहे. धाराशिव शहरातील सर्व प्रभागासाठी सागर प्रधान मो.क्र. – ७३४९४९९२९८ तर प्रभाग क्रमांक १ ते५ साठी दादा ओव्हाळ मो.क्र. – ९८८१४४८३६४, प्रभाग क्रमांक ६ ते १० साठी दिगंबर डुकरे मो. क्र. – ८८८८२२७०८७, प्रभाग क्रमांक ११ ते १५ साठी गाझीमियाँ शेख मो.क्र. – ८७८८५८०५०० व प्रभाग क्रमांक १६ ते २० साठी मो.क्र. फारुख शेख मो.क्र. – ८७८८५५४४७५ यांच्याशी संपर्क साधावा. तसेच या व्यतिरिक्त आपल्या प्रभागातील कचरा किंवा नाली साफसफाई केली जात नसेल तर नगरपरिषद कार्यालयातील येऊन तक्रार नोंदवही मध्ये त्या तक्रारी नोंदवाव्यात असे आवाहन मुख्याधिकारी वसुधा फड यांनी केले आहे.

# शासनाच्या योजनांचा लाभ देण्यासाठी मदत करणार– शोभा जाधव

## शासन आपल्या दारी उपक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद




धाराशिव दि.१४ (प्रतिनिधी) – शासकीय योजनांचा लाभ वंचित व शेवटच्या घटकातील सर्वसामान्य व्यक्तींना कसा देता येईल यासाठी सर्वतोपरी मदत करणार असल्याचे आश्वासन निवासी उपजिल्हाधिकारी शोभा जाधव यांनी दि.१४ मार्च रोजी दिले.

धाराशिव शहरातील कृषी उत्पन्न बाजार समिती मार्केट यार्ड परिसरात असलेल्या गोडाऊनमध्ये धाराशिव तहसील कार्यालयाच्यावतीने शासन आपल्या दारी, योजना कल्याणकारी, सर्वसामान्यांच्या दारी या मोहिमे अंतर्गत भटक्या विमुक्त जाती, आदिवासी अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांना जातीचे प्रमाणपत्र आधार कार्ड यासह विविध प्रमाणपत्र वाटप शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी धाराशिव तहसीलच्या तहसिलदार डॉ मृणाल जाधव, नायब तहसिलदार श्वेता घोटकर, निलेश काकडे, नगर परिषदेच्या मुख्याधिकारी वसुधा फड, आदिवासी पारधी महासंघाचे प्रदेश कार्याध्यक्ष सुनील काळे, भटके विमुक्त विकास परिषदेचे प्रा. लक्ष्मण सुपनार आदी उपस्थित होते. पुढे बोलताना जाधव म्हणाल्या की, महाराष्ट्र शासन राज्यातील प्रत्येक नागरिक विशेषतः गोरगरिबांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी विविध शासकीय योजना राबवीत आहे. त्या योजनांचा लाभ प्रत्येक गरजू, वंचित व शेवटच्या घटकातील व्यक्तींना मिळणे अत्यंत गरजेचे आहे. त्यासाठी गाव, वाडी व वस्ती स्तरावर शासनाच्या सर्व योजनांची माहिती ग्रामसेवक, तलाठी यांच्या सह विविध यंत्रणेचे अधिकारी कर्मचारी देण्याचे काम करत आहेत. त्यामुळे त्या योजनांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक असलेली सर्व कागदपत्रे उपलब्ध करून देण्यासाठी शासन आपल्या दारी हा अतिशय महत्त्वाकांक्षी उपक्रम सर्वत्र राबविण्यात येत येत असल्याचे त्यांनी सांगितले. तर जिल्हाधिकारी डॉ सचिन ओंबासे हे प्रशासनातील मानवी चेहरा असून ते संवेदनशील आहेत. ते शासकीय योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी सकारात्मक दृष्टिकोन ठेवून काम करीत असल्यामुळे जिल्हा प्रशासनाला देखील यश येत असल्याचे त्यांनी सांगितले. तर डॉ जाधव म्हणाल्या की, प्रत्येक समूहात आहे रे आणि नाही रे असे घटक असतात. कायद्याच्या चौकटीत राहून जास्तीत जास्त मदत कशी करता येईल यासाठी प्रयत्न करण्यात येतील असे आश्वासन त्यांनी दिले. तसेच सुनील काळे म्हणाले की, जिल्हाधिकारी डॉ सचिन ओंबासे यांनी शासकीय योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी विशेषतः आदिवासी पारधी बांधवांना अतिशय सकारात्मक पावले उचलली आहेत. त्यांच्यामुळे महाराष्ट्र राज्यामध्ये धाराशिव जिल्हा आदिवासी पारधी बांधवांना शासकीय योजनेचा लाभ मिळण्यासाठी आवश्यक असलेली सर्व कागदपत्रे उपलब्ध करून देऊन त्यांना तो लाभ मिळवून देण्यामध्ये अग्रेसर असल्याचे त्यांनी नमूद केले. विशेषतः महसूल व पोलीस प्रशासनाने आदिवासी पारधी बांधवांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी अत्यंत महत्त्वाची भूमिका पार पाडली. त्यामुळे आधार कार्ड, मतदान कार्ड, रेशन कार्ड यासह इतर प्रमाणपत्र मिळवून दिल्याने पारधी बांधवांना खऱ्या अर्थाने विकासाच्या प्रवाहात आणले असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते विठ्ठल पवार यांना मतदान कार्ड तर ललिता काळे, गौरी काळे, पूजा पवार, रेखा पवार, चंदा काळे, काळुबाई काळे, विमलबाई पवार, सखुबाई पवार, संगीता पवार, कविता शिंदे यांना रेशन कार्ड तसेच माही काळे भाऊ काळे रमेश पवार अविनाश काळे व श्याम काळे यांना प्रतिनिधिक स्वरूपात जात प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले. या शिबिरामध्ये भटक्या विमुक्त जाती, आदिवासी अनुसूचित जमाती, वासुदेव, वडार, कुडमुडे जोशी यांच्यासह इतर भटक्या जमातीतील नागरिकांना लाभार्थ्यांना जात प्रमाणपत्र, संजय गांधी निराधार योजना, इंदिरा गांधी व श्रावण बाळ योजना लाभ मतदान कार्ड, आधार कार्ड, रेशन कार्ड, आयुष्यमान भारत योजना, पॅन कार्ड व बँक खाते आदी नोंदणी करुन ते वाटप करण्यात आले. प्रारंभी दीप प्रज्वलन व बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. मंडळ अधिकारी, तलाठी, तहसील कार्यालय, नगर परिषद कार्यालय आदी विभागातील अधिकारी कर्मचारी व पारधी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## दुकान भाडयाने देणे आहे

शिवाजी चौक देगलूर रोड उदगीर १८ x ६५ ची ३ मजली ईमारत भाडयाने देणे आहे.

संपर्क
शिवशंकर नागठाणे
मो.नं. ९८९०७१८५०५
मो.नं. ८३८०८३५५७५
मो.नं. ८६००१८६५५८





# यशवंत

शुक्रवार दि. १५ मार्च २०२४

# उदगीर

पान ८

कार्यालय :०२३८५-२५३९९८ मो.९८५०२२८२४०
email - yashudgirram@gmail.com



**बालाजी अर्बन को-ऑप, क्रेडीट सोसायटी लि.**

**शिवाजी चौक मोंढा रोड, मार्केट यार्ड, उदगीर, पिन ४१३५१७**

| कालावधी | व्याजदर | जेष्ठ नागरिक व महिलांसाठी व्याजदर |
|---|---|---|
| ३१ दिवस ते ४५ दिवस | ६.००% | ६.५०% |
| ४६ दिवस ते १८० दिवस | ७.००% | ७.५०% |
| १८१ दिवस ते ३६५ दिवस | ८.००% | ८.५०% |
| १ वर्ष १ महिना ते २ वर्ष | ९.००% | ९.५०% |
| २ वर्ष १ महिना ते ३ वर्ष | ९.२५% | ९.७५% |
| ३ वर्षापुढील मुदतीकरीता | १०.००% | १०.५०% |

मासिक प्राप्ती योजना :- आज रुपये १,००,०००/- भरा आणि दर महिन्याला रु.८०६/- मिळवा, मुदती नंतर रु.१,००,०००/- परत मिळवा. (सदरील योजना ३० महिने मुदतीकरिता उपलब्ध.) (९.७५%)

दाम दुप्पट योजना :- रुपये १,००,०००/- भरा आणि ८३ महिन्यामध्ये मिळावा रुपये २,००,०००/- (१०.१४%)

**उपलब्ध सुविधा**

वेअरहाउस लोन, गोल्ड लोन, कर्ज प्रक्रिया, जलद सेवा, एसएमस बँकींग, मोबाईल बँकींग


# मतदार संघातील ५३ कि.मी. च्या रस्त्यासाठी ३०१ कोटी रुपयाचा निधी मंजुर

### क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्री संजय बनसोडे यांची माहिती



उदगीर : उदगीर - जळकोट मतदार संघातील अनेक गावे गेल्या कित्येक वर्षापासून रस्त्यापासुन वंचित होते. त्यामुळे तेथील ग्रामस्थांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत होती तर काही रस्त्यांची दुर्दशा झाल्यामुळे अपघात होत होते ही बाब नामदार संजय बनसोडे यांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी वेळोवेळी पाठपुरावा करून अनेक वाडी, तांडे व गावे विकासापासून दूर होते त्यांना विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी शासन दरबारी मागणी करुन कोट्यावधी रुपयाच्या निधीची तरतुद करुन तो निधी मंजूर करुन घेतला. त्यातच आपल्या मतदार संघात दळणवळण वाढली पाहिजे म्हणून उदगीर व अहमदपुर मतदारसंघातुन नांदेड जिल्हा व जिल्हा सरहद्द पर्यंत जोडणाऱ्या प्रमुख रस्त्यांची कामे हायब्रीड ॲन्युइटी मोड अंतर्गत मंजूरी देण्याबाबत निधी उपलब्ध करुन देण्याची मागणी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्याकडे क्रीडा मंत्री संजय बनसोडे यांनी केली होती. ती मागणी मान्य करुन सदर

चाकुर-शेळगाव-किनी यल्लादेवी- वाढवणा-घोणशी-गुत्ती-अतनुर रस्ता रा. मा. २६८ (कि.मी.) ०/०० ते ते ४३/६०० या रस्त्याला मंजुरी देवुन तब्बल ३०१ कोटी रुपयाचा निधी मंजूर करण्यात आल्याची माहिती क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्री संजय बनसोडे यांनी दिली आहे.

गेल्या कित्येक वर्षात अनेक लोकप्रतिनिधी होऊन गेले पण छोट्या गावात व वाडी तांड्यावर कोणीच लक्ष दिले नव्हते मात्र मतदार संघातील एका एका गावात अनेकवेळा जावुन नागरीकांच्या अडचणी समजून घेवुन मतदार संघात रस्त्याच जाळ निर्माण करणारे ते एकमेव आमदार व मंत्री असावेत अशी प्रतिक्रिया मतदार संघातून ऐकवयास मिळत आहे.

चाकुर-शेळगाव-किनी यल्लादेवी- वाढवणा-घोणशी-गुत्ती-अतनुर हा रस्ता झाल्याने या भागातील नागरिकांना या रस्त्याचा मोठा फायदा होणार असल्याने या भागातील नागरिकांनी क्रीडा मंत्री संजय बनसोडे यांचे आभार व्यक्त केले आहेत.

# उदगीर रोटरी क्लबच्या वतीने महिलांचा गौरव



उदगीर (ता.प्र.) रोटरी क्लब ऑफ उदगीर सेंट्रलच्या वतीने जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून समाजातील विविध स्तरातील कर्तृत्ववान सहा महिलांचा सन्मानचिन्ह देवून गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रोटरीच्या अध्यक्षा मंगला विश्वनाथे, लातूर येथील ममता हॉस्पिटलच्या प्रमुख डॉ. माया कुलकर्णी, प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विद्यालयाच्या प्रमुख महानंदा बहेनजी, रोटरीच्या सचिव सरस्वती चौधरी, प्रोजेक्ट चेअरमन महानंदा सोनटक्के आदींची व्यासपीठावर उपस्थिती होती.

यावेळी बोलताना ब्र.कु. महानंदा बहेनजी यांनी, एक स्त्री शिकली तर संपूर्ण कुटुंब शिक्षित होते. महिलांनी मर्यादायुक्त जीवन जगावे, संपूर्ण घर एकत्र ठेवण्याची किमया स्त्रीमध्ये असल्याचे सांगून, संस्कृती टिकविण्याची जबाबदारी तिच्यावर असल्याचे सांगितले.

डॉ. माया कुलकर्णी यांनी, महिलांच्या सक्षमीकरणासाठी शिक्षण महत्वाचे असून आज सर्वच क्षेत्रात महिला आघाडीवर आहेत. महिलांनी स्वत:तील शक्ती ओळखून कार्य केल्यास गगनाला गवसणी घालण्याचे सामर्थ्य निर्माण होते असे म्हणाले. दुधिया हनुमान मंदिर परिसरात आयोजित या कार्यक्रमात जळकोटच्या तहसीलदार सुरेखा स्वामी, प्रा. डॉ. निलांबीका हुनगुंद(बडीहवेली), अँड. सीमा लोया, प्रवीणा वासवे, शांता मुकरंबी, वनिता क्यादापुरे आदींना महिलाशक्ती पुरस्कार देवून गौरविण्यात आले. यावेळी सत्कारमूर्ती तहसीलदार सुरेखा स्वामी व अँड. सीमा लोया यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमात महिलादिनानिमित्त आयोजित विविध स्पर्धांचे पारितोषिक वितरण उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन नीता मोरे यांनी केले. आभार सरस्वती चौधरी यांनी मानले. कार्यक्रमास ज्योती चौधरी, सुनीता मदनुरे, विद्या पांढरे, कीर्ती कांबळे, डॉ. सुलोचना येरोळकर, प्रा. डॉ. सुनीता लोहारे, अँड. विक्रम संकाये, संतोष फुलारी, रविंद्र हसरगुंडे, चंद्रकांत ममदापुरे, अनिल मुळे आदी रोटरी पदाधिका-यांसह विविध क्षेत्रातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# महिला बचत गटांनी बँकेच्या विविध यैजनेचा लाभ घ्यावा :लक्ष्मण सरंबळकर



उदगीर (प्रतिनिधी)महिला बचत गटांनी बँकेच्या विविध यैजनेचा लाभ घ्यावा असू आवाहन प्रबंधक भारतीय स्टेट बँक मुख्य शाखा प्रबंधक लक्ष्मण सरंबळकर केले.

नगरपरिषद, दीनदयाळ अंत्योदय योजना- राष्ट्रीय नागरी उपजीविकाअभियानांतर्गत मुख्याधिकारी सुंदर बोंदर यांच्या मार्गदर्शनाखाली जागतिक महिला दिना निमित्त महिला बचतगटातील सदस्यांचे आर्थिक साक्षरता प्रशिक्षण संपन्न झाले.

प्रशिक्षणाच्या सुरुवातीला क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन उपस्थित मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात आले. मुख्याधिकारी यांच्या संकल्पनेतून जागतिक महिला दिना निमित्त उदगीर नगरपरिषद कार्यलयातील सर्व महिला अधिकारी कर्मचारी, प्रातिनिधिक महिला सफाई मित्र यांचा सन्मान करण्यात आला.

उपस्थित महिला बचतगटातील सदस्यांना मार्गदर्शन करतांना लक्ष्मण सरंबळकर, प्रबंधक भारतीय स्टेट बँक मुख्य शाखा उदगीर यांनी महिला बचत गटातील सदस्यांना बँकेच्या योजनाचा लाभ घेण्याबद्दल आवाहन करत त्यांनी सुकन्या योजना, प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना, प्रधानमंत्री सुरक्षा विमा, वैयक्तिक अपघात विमा, कर्ज प्रस्ताव परिपूर्ण, कर्ज विहित वेळेत परत फेड या विषयी सविस्तर माहिती दिली.

युवराज खेडकर, शाखा व्यवस्थापक यांनी महिला बचतगटाची पंचसूत्री, फिरता निधी, बँक कर्ज प्रस्ताव परिपूर्ण कसा असावा, बँक महिला बचत गटांना बचतीच्या सहा पट कर्ज देते, नियमित परत फेड यासह सर्व सदस्यांनी स्वत: व कुटुंबातील सदस्यांचा प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना, प्रधानमंत्री सुरक्षा विमा या कमी कमी रक्कम असलेल्या विमा योजनाचा लाभ घ्यावा.

डॉ.माधवी जाधव, स्त्री रोग तज्ञ, उपजिल्हा रुग्णालय उदगीर यांनी उपस्थित महिलांना मार्गदर्शन करतांना महिलांनीच आपले आरोग्य जपावे, महिला या यशोमती आहेत, महिलांनी स्वत: आणि कुटुंबातील सदस्यासाठी सकस व सर्व प्रकारचे व्हिटामिन व घटक असणारे अन्न बनवावे. जेवताना ताट हे पूर्ण भरलेले असावे ज्यात भाकरी, चपाती, दही, लिंबू, पाले भाज्या, डाळी, मोड आलेले कडधान्य या सर्वांचा सहभाग असावा. आरोग्य सुदृढ राहावे यासाठी चालणे, सायकलिंग, पोहणे, प्राणायाम योगासने इ. व्यायाम आवश्यक आहे. वेळेचा सदुपयोगकरावा, मोबाईलचा अति वापर टाळावा, महिलांनी मासिक पाळी दरम्यान घ्यावयाची काळजी बाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

अनिता येलमटे, आदर्श शिक्षिका, साहितीक, तज्ञ प्रशिक्षक यांनी महिलांशी संवाद साधताना आपण एकत्र येण्यामागे सर्वात मोठे योगदान क्रांत्रीज्योती सावित्रीमाईचे आहे. आपण महिला राजकीय, शैक्षणिक, सामाजिक, साहित्य, प्रशासन, क्रीडा सर्वच क्षेत्रात आघाडीवर आहेत. पुरुषांना विनाकारण आपण बोलतो परंतु महिलाच महिलांच्या शत्रू असे आपण का वागतो. मोठ्या मानाने मुली प्रमाणेच सुनेला हि सांभाळावे. आपण महिला मल्टी टास्कींग ऑफिसर आहोत. बचत गटाच्या माध्यमातून महिला आर्थिक सक्षम होण्यासाठी मोठी संधी उपलब्ध आहे. त्यानुसार या संधीचे सोने करत आर्थिक स्वावलंबी होता येईल, त्यासाठी गटाचे दर्जेदार पदार्थ / वस्तू निर्मिती करून सामाजिक माध्यमाच्या मदतीने आणि स्वतः विक्री व्यवस्थापन कौशल्य आत्मसाद करून करावे. आपण सर्व पाश्चात्य संस्कृतीचे अनुकरण करत आहोत. हे अनुकरण थांबवण्याकरिता महिलांची भूमिका फार मोठे असेल आपण आपल्या कुटुंबाला वाचवायचे असेल तर पुस्तक वाचनाची सवय लावावी लागेल. बाजारात अनेक दर्जेदार पुस्तके उपलब्ध आहोत त्याचा उपयोग करावा.

उपस्थित महिलांना प्रेरणा व प्रोत्साहन मिळावे यासाठी बचत गटाच्या माध्यमातून झालेले स्व: परिवर्तन यशोगाथा एनयुएलएम सीआरपी अनिता चौधरी व उमेद अभियानाच्या सीआरपी गोदावरी शिंदे यांनी आपला गटात येण्यापूर्वी पासून ते आज तागायत झालेला विकासात्मक वास्तव बदल चित्र मांडले.

कार्यक्रमास उपमुख्याधिकारी सतीश बिलापटे, महेश शिंदे, न.प. कार्यालयातील सर्व महिला अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शहर अभियान व्यवस्थापक महारुद्र गालट यांनी केले तर आभार विशाल गुडसूरकर यांनी मानले. कार्यक्रम यशस्वितेसाठी समुदाय संसाधन व्यक्ती अनिता चौधरी, शिल्पा काळे, सुवर्णा धुळेकर, स्मिता ठाकूर यांनी मेहनत घेतली.

# अन्नाच्या भुकेने वळले लावणीकडे लोककलावंत प्रमिला लोदगेकर



उदगीर(राम मोतीपवळे) प्रतिकूल परिस्थितीवर मात करतच यशाचे शिखर गाठता येते. त्यामुळे गरिबी परिस्थितीविषयी नकारात्मकता बाळगण्यापेक्षा आपण कलेवर प्रेम केले पाहिजे. कला कोणतीही असो ती प्रामाणिकपणे जोपासा. कुटुंबातील हालाखीच्या परिस्थितीमुळे पोटाची खळगी भरण्यासाठी लावणीकडे वळले, असे मत उस्ताद बिस्मिल्ला खान राष्ट्रीय युवा पारितोषक विजेत्या लोककलावंत प्रमिला लोदगेकर यांनी व्यक्त केले. त्या महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलन उदयोत्सव - २०२४ च्या समारोप समारंभ व पारितोषिक वितरण कार्यक्रमात बोलत होत्या.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे सचिव रामचंद्र तिरुके हे होते. यावेळी व्यासपीठावर संस्थेचे अध्यक्ष मल्लिकार्जुन मानकरी, सहसचिव ड.एस.टी.पाटील, डॉ. आर.एन.लखोटिया, सदस्य बसवराज पाटील नागराळकर, बसवराज पाटील मलकापूरकर, शिवराज वल्लापुरे, मन्मथ बिरादार, प्रशांत पेन्सलवार, माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष रमेशअण्णा अंबरखाने, महाविद्यालय विकास समिती सदस्य पंडित सूर्यवंशी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर.के.मस्के, उपप्राचार्य एस.जी.कोडचे, प्रा.जे.आर. कांदे, प्रा.एस.व्ही.मुडपे, विद्यार्थी कल्याण मंडळ प्रभारी डॉ. सुरेश लांडगे यांची उपस्थिती होती.

पुढे बोलताना लोदगेकर म्हणाल्या, आई-वडिलांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी उच्चविद्या विभूषित होण्याचे स्वप्न बाळगा. महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यायाने सांस्कृतिक क्षेत्रामध्ये स्वतःचा एक वेगळा पॅटर्न निर्माण केला आहे. तो आपण सर्वांनी जोपासावा, असे आवाहन उपस्थितांना केले. उदगीर ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक तानाजी चेरले म्हणाले, विद्यार्थ्यांनी ध्येय निश्र्चित करून वाटचाल करावी. आई-वडील व गुरुजनांना सार्थ अभिमान वाटेल असे कर्तृत्व साध्य करावे. सुप्रसिद्ध निवेदिका प्रा.शोभा कुलकर्णी म्हणाल्या, स्नेहसंमेलनातून कलाकार घडत असतात. मराठवाड्याची माती कर्तुत्वासाठी नेहमीच प्रेरक राहिली आहे, याचा सार्थ अभिमान आपल्या सर्वांना असावा. अध्यक्षीय समारोप करताना रामचंद्र तिरुके म्हणाले, समाजाने लावणीकडे, लोककलावंताकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलावा प्रत्येक कला ही सांस्कृतिक कलात्मकतेमध्ये भरच टाकत असते त्यामुळे महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी उच्च ध्येय ठेवून आपले स्वप्न साकार करण्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न करावेत असे आवाहन उपस्थितांना केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आर.के.मस्के यांनी तर पाहुण्यांचा परिचय प्रा.डॉ. मल्लेश झुंगास्वामी यांनी दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्नेहा नामवाड व सुष्मिता बोरगावकर यांनी तर आभार विद्यार्थी कल्याण मंडळाचे प्रभारी प्राध्यापक डॉ.सुरेश लांडगे यांनी मानले.

# गटशिक्षणाधिकारी जयसिंह जगताप गुरु गौरव पुरस्काराने सन्मानित

**माधव होनराव**

जळकोट : जळकोटचे गटशिक्षणाधिकारी जयसिंह जगताप यांनी शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनिय कामगिरी केल्याबद्दल त्यांना शिक्षक परिषदेचा जिल्हास्तरीय आदर्श गटशिक्षणाधिकारी गुरू गौरव पुरस्कार लातूरच्या दयानंद सभागृहात ता. १० मार्च रोजी मान्यवरांच्या हस्ते देण्यात आला.

जळकोटचे जयसिंहजी जगताप यांना यावर्षीचा आदर्श गटशिक्षणाधिकारी गुरु गौरव पुरस्कार महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेच्या वतीने जाहीर झाला होता. या पुरस्काचे वितरण लातूर येथील दयानंद सभागृहात रविवारी शिक्षक आ. विक्रम काळे, मा. आ. बब्रुवान खंदाडे, अजित पाटील कव्हेकर, शिक्षक परिषदेचे जि. अध्यक्ष मच्छिंद्र गुरमे यांच्या हस्ते करण्यात आले. त्यांच्या समर्पित कार्याने व व कुशल प्रशासनातून जळकोट सारख्या डोंगरी तालुक्यास शैक्षणिक प्रवाहात आणण्याचे कार्य ते सातत्याने करत आहेत.जळकोट तालुका आज विविध शैक्षणिक बाबतीत लातूर जिल्ह्यामध्ये अग्रेसर ठरत आहे.

तालुकास्तरावर असणारे शिक्षकांचे प्रश्न विनाविलंब सोडविण्याचा त्यांनी ध्यास घेतलेला आहे. सामान्य शिक्षकांचे कोणतेच प्रश्न कार्यालयामध्ये प्रलंबित न ठेवता शिक्षकांना आपले लक्ष अध्यापनावर केंद्रित करता यावे, यासाठी त्यांनी नियोजनबद्ध प्रयत्न ते करत असतात. विशेष म्हणजे महिला शिक्षकांच्या बाबतीत त्यांनी अत्यंत सहानुभूतीने भूमिका घेऊन त्यांचेही प्रश्न प्राधान्याने मार्गी लावण्याचे काम ते करत आह त. एक शिक्षक ते सर्वोत्तम गटशिक्षणाधिकारी हा त्यांचा प्रवास अत्यंत प्रेरणादायी असाच आहे. आपल्या सद्वर्तनातून त्यांनी शिक्षण क्षेत्रात अनेक आदर्श निर्माण केलेले आहे.



स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९४व्या जयंतीनिमित्त शिवजन्मोत्सव सोहळा समितीच्या वतीने विविध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते या स्पर्धेचे बक्षीस वितरण सोहळा नगरपरिषद समोरील मैदानावर पार पडला. या स्पर्धेत जी के इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थ्यांनी गायन स्पर्धेतअनुक्रमे प्रथम ,द्वितीय, तृतीय पारितोषिक पटकावले त्याबद्दल संस्थेचे चेअरमन रमेश बिराजदार ,संस्थेचे डायरेक्टर सुयश बिराजदार व प्राचार्य संतोष नायर ,सी.ई.ओ. विनोद पाटील यांनी विद्यार्थ्यांचे प्रमाणपत्र देऊन यथोचित सत्कार केला.ही स्पर्धा यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी संगीत शिक्षक जोगेंद्र सोमवंशी , क्रीडा शिक्षक प्रशांत सुतार सांस्कृतिक विभाग प्रमुख सौ.अविष्कार शिंदे यांनी परिश्रम घेतले. त्यांचा सार्वजनिक शिवजयंती समितीच्या वतीने यांना भेटवस्तू व प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला.